संपादकीय

साहित्यप्रेमींची गप्पामंडळे

पुणे नगर वाचन मंदिराचा दीडशेवा वर्धापन दिन नुकताच साजरा झाला. त्यानिमित्ताने त्या संस्थेचे अध्यक्ष म. श्री. दीक्षित यांनी दीडशे वर्षाचा इतिहास सांगणारी एक पुस्तिकाही तयार केली आहे. त्यावरून या वाचनमंदिराच्या आजवरच्या वाटचालीची कल्पना येते. इ. स. १८४८ साली हे वाचनालय स्थापन झाले. लोकहितवादी रा. ब. गोपाळ हरी देशमुख, न्यायमूर्ती रानडे, डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर या तिघांनी त्याच्या स्थापनेत पुढाकार घेतला होता. 'पुण्यात लायब्ररीची स्थापना' या शीर्षकाखाली शतपत्रामध्ये लोकहितवादींनी 'पूना नेटिव्ह जनरल लायब्ररी' विषयी माहिती देणारे एक 'पत्र' २६ मार्च १८४८ च्या प्रभाकर साप्ताहिकात लिहिले होते. त्यावेळी या लायब्ररीत '३०० बुके व चार अखबारा' असल्याचा उल्लेख त्यांनी केली आहे. ''पुण्यातील किती एक आळशी लोकांस लायब्ररी काय हे माहीत नाही, याच कारणामुळे सरदार लोकांनी व कामदार लोकांनी उदारपणाने पैसा दिला नाही.'' यासारखी त्यातील विधाने आजही तेवढीच वास्तव आहेत. १३ मे १८७९ रोजी बुधवार वाड्याला आग लागून त्यातील लायब्ररी भस्मसात झाली. न्या. रानडे यांनी १८७१ पासून या लायब्ररीच्या कामकाजात लक्ष घातले. १८८९ मध्ये सध्याच्या जागी लायब्ररीचे कामकाज सुरू झाले. १४० वर्गणीदार त्यावेळी होते. १९२१ मध्ये उत्पन्नाचे साधन म्हणून शेजारीच लक्ष्मीरोडवर नवीन इमारत बांधली. संस्थेचे नाव बदलण्यात आले. पुढे तिच्यात वाढ होत राहिली. वाचनालयाची प्रगती होत राहिली. १९४९ साली शताब्दी सोहळा झाला. नुकताच दीडशेवा वाढदिवसही साजरा झाला. सध्या ३३ हजार ग्रंथसंख्या, ४२०० वर्गणीदार असा भव्य पसारा आहे.

या वाचन मंदिराचे एक वैशिष्ट्य म्हणजे तेथील गप्पा मंडळ. तळमजल्यावरील अंगणात चार बाकांवर बैठक मारून सकाळ संध्याकाळ अनेक लेखक, कवी, वाचक व रसिक गप्पांच्या मैफली रंगवतात. पूर्वी त्यात कृष्णशास्त्री चिपळूणकर, केरुनाना छत्रे, माधवराव कुंटे वगैरे मंडळी सहभागी होते; पुढे काकासाहेब गाडगीळ, गो. ल. आपटे, ग. वि. केतकर इत्यादी मंडळी मैफलीत काव्यशास्त्रविनोदाची बहार आणत. त्यापुढच्या पिढीत श्री. ज. जोशी, राजाभाऊ पाठक, म. श्री. दीक्षित, वसंतराव गोखले, कानडे गुरुजी इ. अनेकांनी या साहित्यिक अड्ड्यावर मैफली जमवल्या.

अशा मैफली या प्रत्येक गावी, प्रत्येक ग्रंथालयात रंगायला हव्यात असे आम्हाला वाटते. अशा अनौपचारिक चर्चांमधून राजकारण, समाजकारण, साहित्य, चित्रपट, नाटक इ. विषयांवरील नव्याजुन्या मतमतांतरांची उजळणी होते. युक्तिवाद बिनतोड व चिरेबंदी होत जातात. नव्या लेखक कवींच्या दृष्टीनेही असे अड्डे प्रेरणादायक ठरतात. त्यातून त्यांना नवनव्या कल्पना

मिळतात. लिहिलेल्या लेखनातील गुणदोषांचा पत्ता लागतो. सुधारणेला अवसर मिळतो. ''काव्यशास्त्रविनोदेन कालौ गच्छति धीमताम्'' म्हणतात, ते खरेच आहे.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कट्ट्यावरही एकेकाळी मराठीतील नवीन धडपडणाऱ्या लेखककवींची वर्दळ असे. या ग्रंथसंग्रहालयात मनोहर पारायणे यांच्यासारखे जागरूक ग्रंथपाल असल्यामुळे अभ्यासकांना अनेक संदर्भ सहजपणे उपलब्ध होत. तसेच मध्यवर्ती ठिकाणी असल्याने गंभीरपणे वाचनलेखन करायलाही सोयीस्कर जागा म्हणून या स्थळाकडे नवेजुने धडपडणारे लेखक व अभ्यासक आकृष्ट होत. तुलसी परब, सतीश काळसेकर, अशोक नायगावकर, मनोहर ओक, गुरुनाथ धुरी, श्रीकांत सिनकर, राजा ढाले, सीताराम गिरप, राजन साटम वगैरे मंडळी या कट्ट्यावर दिसत. नवीन वाचनीय पुस्तके, वृत्तपत्रात आलेले लेख, नव्या चळवळी, नवे वादविवाद, नवीन प्रवाह यावर तेथे अनौपचारिक गप्पा चालत. १९६० ते १९७५ या दरम्यान हा कट्टा अशा उगवत्या ताऱ्यांनी उजळून निघे. एकमेकांना लिहिण्यासाठी, प्रयोग करण्यासाठी त्यातून प्रेरणा मिळे; एकमेकांशी लेखनाबाबत स्पर्धाही चाले. एक प्रकारचे झपाटणारे वातावरण असे. ते साहित्यविचारावरच्या श्रद्धांना उपकारक ठरे... पुढे अर्थातच हा कट्टा पुढच्या पिढीतल्या धडपडणाऱ्या युवा कवी-लेखकांच्या वर्दळीने गजबजायला हवा होता.. पण तसे घडले नाही...

...तरीही अशा कट्ट्यांची उपयुक्तता वादातीत आहे. पुणे नगर वाचन मंदिर असो, मुंबई ग्रंथसंग्रहालय असो की नाशिक सार्वजनिक वाचनालय असो, ते त्या त्या परिसरातील नव्याजुन्या साहित्यिकांच्या वर्दळीचे केंद्र बनले पाहिजे. एकूणच त्यामुळे साहित्यकलासंस्कृतीला उठाव येतो. प्रत्येक गावात असे चोखंदळ, रसिक, जाणकार अभिजनांचे अड्डे ग्रंथालयांच्या आश्रयाने जर विकसित झाले तर साहित्यिक वातावरणाला ते पोषत ठरेल. कोणतेही उपक्रम हे शेवटी व्यक्तींच्याच कल्पकतेतून व कष्टातून साकार होत असतात. म्हणून वेगवेगळ्या क्षेत्रातील रसिक स्त्रीपुरुषांची व ग्रंथ-कलाप्रेमींची मैफल तेथे सतत अनौपचारिकपणे झडत राहिली पाहिजे. त्या त्या ग्रंथालयाच्या पदाधिकाऱ्यांनी असा अड्डा आपल्या वास्तूत भरत राहावा म्हणून सोयीस्कर जागा व सुविधाही उपलब्ध करून द्यायला हव्या. त्यातून संस्थेच्या एकूण कामकाजालाही उठाव येईल आणि गावातील वाङ्मयीन वातावरणही चैतन्यशील राहील.

....असे अड्डे ज्या वाचनालयात आजही भरत असतील, त्यांची माहिती आम्हाला हवी आहे. त्या अड्ड्यांची माहिती आम्ही प्रसिद्ध करू. परगावाहून येणाऱ्या साहित्यप्रेमींना त्या अड्ड्यामुळे स्थानिक लेखककवींशी अनायासे संपर्क साधण्याच्या दृष्टीनेही ही माहिती उपयुक्त ठरेल. साहित्यप्रेमी रसिकांनी परस्परांच्या सतत संपर्कात राहून आपली मांदियाळी घनिष्ठ केली पाहिजे. आपल्यातील भ्रातृभाव वाढवला पाहिजे.

– संपादक



मला जाणवलेली तसलिमा

– मृणालिनी गडकरी

मी एक मध्यमवर्गीय गृहिणी आहे. आतापर्यंत माझ्या वाट्याला आलेली दु:खं, अन्याय – सामाजिक व कौटुंबिक – हे माझे व्यक्तिगत आहेत असेच मला वाटत होते. पण १९९६ मध्ये बांगलादेशची बंडखोर लेखिका तसलिमा नसरिन हिच्या काही पुस्तकांच्या अनुवाद केल्यावर माझ्या वाट्याला आलेल्या अन्यायांतील काही सार्वत्रिक आहेत, ह्याची मला जाणीव झाली. स्त्रियांवर होणाऱ्या ह्या अन्याय-अत्याचारांवर तसलिमाने सुचवलेले उपाय आत्यंतिक टोकाचे असतीलही; पण तिने मांडलेल्या स्त्रियांच्या समस्या मात्र अत्यंत वास्तव आहेत.

प्रत्येक स्त्रीला कोणत्या ना कोणत्या समस्येला तोंड द्यावेच लागते; कधी ना कधी अन्याय सोसावाच लागतो. स्त्रियांच्या समस्यांचे स्वरूप भौगोलिक, आर्थिक, धार्मिक वा सामाजिक दृष्ट्या भिन्न असले तरी समस्या ह्या समस्याच असतात. त्या स्त्रियांना त्रासदायकच ठरतात. मुस्लिम स्त्री, भारतीय स्त्री आणि अमेरिकेतील स्त्री ह्यांच्या समस्या ह्या भिन्न असणारच. कारण त्यांच्यात भौगोलिक, आर्थिक, धार्मिक तफावत तर आहेच पण ह्यांच्या इतकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्यात सांस्कृतिक अंतर ठळक जाणवण्याइतके आहे.

आपण फक्त भारतातील स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार करायचा म्हटला तरी ते किती तऱ्हेतऱ्हेचे आहेत, हे लक्षात यायला वेळ लागायचा नाही. आर्थिक आणि धार्मिक कारणाने निर्माण झालेले प्रश्न आपण बाजूला ठेवले तरी इतर कितीतरी प्रश्न शिल्लक राहतातच. शहरातील आणि ग्रामीण भागातील स्त्रियांच्या समस्या ह्या वेगवेगळ्या असणार हे उघडच आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांमध्येही शेती व मोलमजुरी करणाऱ्या स्त्रिया आणि घरकाम करणाऱ्या स्त्रिया असा भेद करता येईल. शहरातील स्त्रियांमध्येही शिकलेल्या व बिनशिकलेल्या, नोकरी करणाऱ्या व घरात बसणाऱ्या, शिक्षण घेऊन घरात बसलेल्या व शिक्षण नसताना मिळवणाऱ्या, करीअरच्या मागे धावणाऱ्या आणि मुलाबाळात रमलेल्या गृहिणी, व्यावसायिक आणि उद्योजक असे भेद करता येतील. ही यादी अजून खूप मोठी होऊ शकेल आणि तिच्याबरोबरच स्त्रियांच्या समस्यांची संख्या वाढत जाईल आणि स्वरूपही बदलेल.

मला आणखी एक मुद्दा महत्त्वाचा वाटतो. 'स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य मिळालं की तिचे अनेक प्रश्न सुटतात' असे म्हटले जाते. पण आतापर्यंत किती स्त्रियांचे प्रश्न अशा रीतीने

सुटलेत? पैसे मिळवायला लागल्या की स्त्रिया खरंच स्वतंत्र होतात का? एक वेळ आर्थिक दृष्ट्या अगदी खालच्या स्तरातील आणि अगदी उच्च स्तरातील स्त्रिया असे स्वातंत्र्य उपभोगताना दिसतील. पण बहुसंख्य मध्यमवर्गातील महिलांना असे स्वातंत्र्य मिळत नाही आणि तिचे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक बिकट होताना दिसतात. नोकरी आणि घरदार सांभाळता-सांभाळता तिची शारीरिक आणि मानसिक दमछाक होते.

स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्यावर होणारे अन्याय ह्यांचा विचार केल्यास काही प्रश्न व अन्याय हे युगानुयुगे चालत आलेले दिसतात तर काहींचे स्वरूप हे कालमानाप्रमाणे बदललेले दिसते. आताच्या काळातील काही समस्या ह्या जीवनमूल्यांच्या अवमूल्यनातून आणि ऱ्हासातून निर्माण झालेल्या दिसतात आणि त्यांचे स्वरूप अधिक भयंकर असल्याचे जाणवते. अशा प्रतिकूल परिस्थितीत एखादी जादूची कांडी फिरवून चित्र पालटणे शक्य नाही, तसेच आहे ही परिस्थिती जैसे थे ठेवणेही योग्य नाही. आता आपण सर्व महिलांनी संघटित होऊन कणखरपणे उभे राहायला पाहिजे; आपले प्रश्न आपणच सोडवण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. कारण आपले प्रश्न, त्यातून वाट्याला येणारे दु:ख, आपल्यावर होणारे अन्याय, त्यांतून निर्माण होणारा ताण ह्यांची तीव्रता आपल्यालाच अधिक खोलवर जाणवते. अर्थात ही गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही पण प्रत्येक स्त्रीमध्ये असलेल्या सुप्त शक्तीचा उपयोग आता आपण करायला हवा असे मला वाटते.

आपण स्त्रिया जास्त सोशिक, दुसऱ्यांना समजावून घेणाऱ्या असतो; निष्ठावंत असतो, विचार करणाऱ्या असतो. त्यामुळे पुरुषांइतक्या प्रमाणात आपण भ्रष्टाचाराला बळी पडत नाही. तारतम्याने वागणे स्त्रीला अवघड नाही. तेव्हा मूल्यांच्या ऱ्हासाला पायबंद घालण्यासाठी पहिले पाऊल आपणच उचलायला हवे. आपण सुशिक्षित स्त्रियांनी, पूर्वीच्या सर्वच परंपरा खरोखरच टाकाऊ आहेत का ह्याचा पुनर्विचार करायला हवा. मला वाटते घरातील संस्कृती ही स्त्रीमुळेच जपली जाते. तेव्हा आपले घर सुसंस्कृत कसे होईल हे प्रथम आपण पाहिले पाहिजे. पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण थांबवून त्यांच्यातील कामसू वृत्ती, प्रामाणिकपणा हे गुण आपल्या आणि आपल्या तरुण पिढीच्या अंगात मुरवायला पाहिजेत. कोणतीही गोष्ट करायची म्हटली की आपल्या घरातूनच विरोधाची सुरवात होते, हे मला पक्के ठाऊक आहे. पण आपला मार्ग बरोबर असेल तर आत्मविश्वासाने पावले उचलली पाहिजेत. आपला आत्मविश्वास सर्व विरोध कुचकामी ठरवतो.

आपण आपले प्रश्न सोडवायचे ठरवल्यावर आपल्याला काही पथ्ये पाळावी लागतील. पहिली गोष्ट म्हणजे आपण जागरुक व्हायला हवे. आपण समाजातील एक महत्त्वाचा घटक आहोत आणि समाजातील प्रत्येक बाबीशी संबंधित आहोत ही खूणगाठ मनाशी बांधली

पाहिजे. 'मला काय त्याचे! घरातील पुरुष पाहून घेतील' असे म्हणणे सोडले पाहिजे. कारण ह्या वृत्तीतूनच आपल्यात आळस व काही न करण्याची भावना निर्माण होते. मग आपण आत्मविश्वास गमावतो, सतत दुसऱ्यावर अवलंबून राहाण्याची सवय लागते.

आपल्यात आणखी एक गोष्ट प्रकर्षाने दिसून येते. ती म्हणजे आपण एकमेकींना मदत करत नाही. उलट एखादी पुढे जायचा प्रयत्न करत असेल तर नाना प्रकारे तिचा पाय मागे खेचण्याचा प्रयत्न करतो. पुरुषही स्वार्थी असतात पण आपल्याइतका ते एकमेकांचा हेवादावा करत नाहीत, त्रास देत नाहीत. ह्याचा फायदा सर्वच पुरुषजातीला होतो. ह्यापासून आपण धडा घ्यावा हे बरे!

मी फक्त आपण स्त्रिया काय करू शकतो ह्याचा विचार केला. पण समाज हा स्त्री व पुरुष ह्या दोन घटकांनी बनला आहे आणि हे दोन्ही घटक सारखेच महत्त्वाचे व परस्परपूरक आहेत. तेव्हा एका घटकाकडून हे काम होणे शक्य नाही. दोन्ही घटकांच्या मानसिकतेत बदल व्हायला हवा – हे खरे पण त्यासाठी कोणीतरी सुरवात केलीच पाहिजे. ती आपण केली तर बिघडले कोठे?

'लज्जा'–एक समृद्ध अनुभव

–लीना सोहोनी

१९९३ सालचा मे महिना होता. सहा डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येत घडलेल्या घटनेचे पडसाद 'लज्जा' या तस्लीमा नसरीन लिखित कादंबरीद्वारे जगभर उमटले होते. बांगलादेशातील या तरुण क्रांतिकारी लेखिकेला त्यापायी देशोधडीला लागण्याची वेळ आली होती. पण माझ्यासारख्या नाकासमोरचे चाकोरीबद्ध जीवन जगणाऱ्या पांढरपेशा गृहिणीशी या सगळ्या राजकारणाचा संबंध नव्हता. वर्षभर चूलमूल, संसार व थोडेफार लेखन करून कंटाळलेली मी निवांतपणे माहेरपणासाठी कोल्हापूरहून पुण्याला आले होते. परंतु हा निवांतपणा चोवीस तासच टिकला.

दुसऱ्या दिवशी सकाळी कोल्हापूरहून श्री. अनिल मेहतांचा फोन आला, "कुरियरने 'लज्जा' पाठवत आहे. वाचून ठेवा." त्यानंतरचे दोन महिने कसे गेले ते अक्षरशः समजलं नाही. मी नेहमीप्रमाणे अनुवाद करण्याच्या आनंदात तहानभूक विसरून गेले, घरादाराकडे

दुर्लक्ष करून रात्रीचा दिवस करून कामाला लागले. ते दिवस भारल्यासारखे होते. अनुवादाचं काम पुरतं संपलंही नसेल तोच वृत्तपत्रांच्या माध्यमातून वाचकापर्यंत बातमी जाऊन पोचली होती. उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त करणारे फोन रोज येत होते. कोणाचे शाबासकीचे फोन तर कोणाचे काळजीचे. अनुवाद प्रसिद्ध होण्यापूर्वीच त्यावर वाचकांनी प्रतिक्रिया देण्यापूर्वीच वृत्तपत्रांचे प्रतिनिधी भेटून मुलाखतीची मागणी करत होते. या सर्व प्रकाराने माझ्या मनावरचे दडपण वाढत होते. हे काम आपल्याला जमेल का? सर्वांच्या अपेक्षा फार उंचावून बसल्या तर? हा अनुभव संपूर्णतया नवा होता.

खरं तर 'लज्जा' हा काही माझा पहिला अनुवाद नव्हे. त्याआधी माझे तीन अनुवाद प्रसिद्ध झाले होते. वाचकांनी व समीक्षकांनी त्यांची बऱ्यापैकी दखल घेतली होती. परंतु 'लज्जा' नावाचे वादळ झंझावातासारखे आले आणि त्याने अवघे चित्र पालटले. लोक विचारत, "तुम्ही हा अनुवाद कशाला करत आहात? तस्लीमा नसरीनच्या शिरावर देहदंडाच्या शिक्षेची टांगती तलवार आहे. तिला घरदार सोडून परक्यांच्या आश्रयाला जावं लागलं आहे. तेव्हा या भानगडीत पडू नका तुम्ही. ही आपल्यासारख्यांची कामं नव्हेत."

परंतु ज्या साहित्यकृतीने अवघ्या जगात खळबळ निर्माण केली, मानवतेच्या मूलभूत प्रश्नांना हात घातला ती साहित्यकृती आपल्या वाचकांना हातात लवकरात लवकर आणून देणं हे अनुवादकाचं परम कर्तव्य आहे. हे काम आज मी नाही केलं तरी दुसऱ्या कोणाला तरी ते करावं लागणारच आहे. 'लज्जा' कादंबरीद्वारे तस्लीमा सारख्या तरुण बंडखोर स्त्रीने जगापुढे मांडलेला प्रश्न मूठभर बांगलावासीयांचा नसून हा साऱ्या मानव जातीच्या अस्तित्वाशी निगडित असणारा प्रश्न आहे. कोणत्याही समाजातील भरडल्या जाणाऱ्या गटाचं ते दुःख आहे व ते दुःख तुमचं, आमचं सर्वांचं आहे. आज जे संकट 'लज्जा' कादंबरीतील मध्यमवर्गीय कुटुंबावर ओढवलं ते उद्या आपल्यावरही ओढवू शकतं. दुःखाला भाषा नसते, जात नसते, काळाची चौकट नसते. ते चिरंतन असतं आणि म्हणूनच विशिष्ट भाषेतील शब्दांच्या भिंतींमध्ये कोंडून पडलेलं हे दुःख मोकळं करून संवेदनाशील वाचकांच्या हृदयापर्यंत पोचवणं हे अनुवादकाचं कर्तव्य असतं व हेच कर्तव्य मी केलं.

परकीय व इतर प्रादेशिक भाषातील गाजलेल्या साहित्यकृती मराठी वाचकांच्या घरापर्यंत पोचवण्याची फार महत्त्वाची कामगिरी मेहता पब्लिशिंग हाऊसने शिरावर घेतली आहे. अनुवादित साहित्याचे एक नवेच दालन मराठी वाङ्मयात खुले केले आहे. जगातील वेगवेगळ्या भाषांतील साहित्याचा मोठा सागर आहे व माझ्या हातात आहे लहानशी घागर. तरी पण त्या घागरीनं पाणी भरत राहाण्याचं कर्तव्य मला करत राहायचं आहे.

साहित्य वार्ता

नारायण सुर्वे यांचा सत्कार

कवी नारायण सुर्वे यांचा 'पद्मश्री' मिळाल्याबद्दल साहित्य अकादमीतर्फे दिल्ली येथे सत्कार करण्यात आला. त्यांचा परिचय कार्यवाह डॉ. के. सच्चिदानंद यांनी इंग्रजीत करून दिला. अकादमीचे अध्यक्ष रमाकांत झा, माजी अध्यक्ष यू. आर. अनंतमूर्ती यांनीही इंग्रजीत आपले विचार मांडले. नारायण सुर्वे यांनी मात्र मराठीतच भाषण केले व आपल्या कविता वाचून दाखवल्या. ''मला तोडकेमोडके इंग्रजी बोलता येईल; पण त्यापेक्षा मातृभाषेतच बोलणे मी पसंत करतो'' असे त्यांनी म्हटले. आपल्या मराठी कवितांचे हिंदी अनुवादही त्यांनी लगेच केल्यामुळे श्रोत्यांनी दाद दिली.

फिलीप रॉथ यांनी पुलित्झर पुरस्कार

अमेरिकेतील कादंबरीकार फिलीप रॉथ यांना यंदाचा वाङ्मयीन 'पुलित्झर पुरस्कार 'अमेरिकन पास्टोरल' या कादंबरीबद्दल देण्यात आला. ते ६५ वर्षांचे असून कॉमिक ट्रिलॉजी, दि काउंटर लाईफ, मॅमॉयर पेट्रोमनी, शब्बाद थिएटर वगैरे त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

परळी वैजनाथच्या साहित्य संमेलनात भा. रा. भागवत यांचा सत्कार

परळी वैजनाथच्या साहित्य संमेलनात फास्टर फेणेचे जनक भा. रा. भागवत यांचा सत्कार झाला. त्यावेळी त्यांनी व्यक्त केलेल्या मनोगतातील काही भाग.

''एका बालसाहित्यकाराचा सन्मान प्रथमच होत आहे त्याबद्दल आनंद वाटतो. मी बालसाहित्यकार म्हणून प्रसिद्ध असलो तरी माझ्या लेखनाची सुरुवात प्रेमकथेपासून झाली. विडंबनात्मक लिहिले. बालसाहित्याकडे तुम्ही कसे वळला? असा प्रश्न विचारला जातो. आमचे घराणे सुधारकाचे. मूर्तिपूजा अमान्य. गणपती हा इंपोर्टेड देव आहे, असे राजारामशास्त्री भागवत म्हणत. मुलींची देखील मुंज करायला हवी असे ते म्हणत. माझे वडील नाशिक हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. त्यांच्या टेबलावर आर्थर मीचे माय मॅगेझिन हे बालमासिक पडलेले असे. ते मी आवडीने वाचत असे. दर्यावर्दी जीवनावरच्या कादंबऱ्या वाचल्या. चार्ली चॅपलिनचे चित्रपट पाहिले. दादासाहेब फाळके आमच्या शाळेत मुलांचे नाटक बसवायला येत. नट वर्तकांनी मग तालमी घेतल्या. बाल मनावैज्ञानिक शास्त्राचा या काळातच थोडाफार संस्कार झाला असावा. पुढे स. का. पाटील यांच्या प्रकाश या साप्ताहिक पत्रात काम करु लागलो. मुलांसाठी पानभर गोष्ट लिहित असे. बालसाहित्याच्या लेखनाचा असा १९३७पासून

आरंभ झाला. द. ग. गोडसे यांची चित्रे मी-माझ्या गोष्टींसाठी घेत असे. खेळगडीचे संपादन का. रा. पालवणकरांनी मजकडे दिले. पुढे मी स्वतःच 'बालमित्र' हे मासिक काढले. त्याला च्याऊमाऊसारखे नाव शोभले नसते. बालमित्रचा साडेसहा वर्षाचा काळ अत्यंत रोमहर्षक गेला. पुढे फास्टर फेणेनेही मोठा आनंद दिला. अनेक भाषांत तो पोचला. मुलांसाठी लिहिताना त्यांच्या वयानुसार भाषा, प्रसंग यांची योजना केली पाहिजे.''

दिलीप चित्रे यांना अनंत काणेकर पारितोषिक

दिलीप पुरुषोत्तम चित्रे लिखित 'एकूण कविता-२' या पॉप्युलर प्रकाशनने प्रसिद्ध केलेल्या काव्यसंग्रहास यावर्षीचे प्रा. अनंत काणेकर स्मृती पारितोषिक जाहीर झाले आहे.

श्रीमती कमलाताई काणेकर यांनी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाकडे दिलेल्या देणगीच्या व्याजातून तीन वर्षातील काव्य, नाटक, प्रवासवर्णन या तीन वाङ्मयप्रकारातून परीक्षक मंडळाने निवड केलेल्या ग्रंथाला दरवर्षी हे पारितोषिक देण्यात येते. रोख तीन हजार रुपये असे त्याचे स्वरूप आहे. डॉ. हरिश्चंद्र थोरात, परेन जांभळे व ज्योतिका ओझरकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. पारितोषिक वितरण सोमवारी ४ मे रोजी सायं. ६ वाजता अनंत काणेकर यांच्या अठराव्या पुण्यातिथीदिनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या नायगाव येथील सुरेंद्र गावसकर सभागृहात झाले.

तुकारामाचे स्थान संस्कृती पुरुषाचे - मोरे

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात संत तुकारामांचे स्थान हे 'संस्कृतिपुरुषाचे' आहे; वाङ्मयप्रवाहाच्या ३५० वर्षाच्या काळातील सर्व प्रवाहात तुकोबांची वाणी एकजीव होऊन शाश्वत झाली आहे असे प्रतिपादन संतसाहित्याचे गाढे अभ्यासक सदानंद मोरे यांनी केले.

अमर हिंद मंडळाने आयोजित केलेल्या वसंत व्याख्यानमालेतील 'तुकाराम दर्शन' या विषयावरील पुष्प गुंफतांना मोरे यांनी हे मत व्यक्त केले. मातब्बर व्यापारी - सावकार घराण्यात नेटकेपणाने आणि व्यवहारकुशलतेने प्रपंच करणाऱ्या तुकोबांना त्यावेळी सलग तीन वर्षे पडलेल्या दुष्काळामुळे निर्माण झालेल्या समाजस्थितीच्या अवलोकनातून परमार्थ साधनेची दिशा मिळाली. त्यानंतर १५ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी जे काव्य लिहिले ते त्यांच्या काळापासून आजतागायत मराठी माणसाच्या जीवनव्यवहाराला व्यापून राहिले आहे, असे त्यांनी सांगितले.

प्रसारमाध्यमे उपलब्ध नसलेल्या काळात देहूच्या वाण्याचे अभंग कोल्हापूर मुक्कामी जयरामस्वामींच्या कीर्तनात ऐकून, संत बहिणाबाई प्रभावित झाल्या व तुकारामांकडे उपदेश घेण्यास गेल्या. तुकोबानंतर संतवाङ्मयाचा प्रभाव कमी होऊन लावणीला महत्त्व आले. परंतु लावणीची नाळ संतवाङ्मयाशीच जुळलेली आहे आणि सगनभाऊसारखे लावणीकार

तुकोबांचे अभंग 'लाघवी' असल्याचे सांगून, 'रामा, मजेवरी गात जा' असे आवाहन करताना दिसतात असे ते म्हणाले.

या पार्श्वभूमीवर पुढे 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा' या आव्हानात्मक पवित्र्यामुळे, दुसऱ्या बाजीरावाच्या काळात ब्राम्हणांना त्यांचे अभंग गायला बंदी झाली. परंतु कविवर्य मोरोपंतांनी बाजीरावाचा निषेध करून, तुकोबांच्या अभंगाशिवाय कीर्तनाची पूर्तता होत नाही असे म्हटले होते हे डॉ. मोरे यांनी निदर्शनास आणून दिले.

वि. स. खांडेकर यांच्या स्मृत्यर्थ संग्रहालय

'ज्ञानपीठ' पारितोषिक विजेते वि. स. खांडेकर यांच्या स्मृत्यर्थ मुंबई विद्यापीठाच्या कालिना येथील परिसरात एक कायमस्वरूपी दालन, संग्रहालय व अभ्यासिका उघडण्यात येण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वि. स. खांडेकर जन्मशताब्दी सोहळा शासकीय सल्लागार समितीची बैठक विद्यापीठाच्या कुलगुरू श्रीमती स्नेहलता देशमुख यांच्या कार्यालयात आयोजिण्यात आली होती. सांस्कृतिकमंत्री प्रमोद नवलकर बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. श्रीमती देशमुख यांनी कायमस्वरूपी दालन उघडण्यास विद्यापीठाची तयारी आहे, असा प्रस्ताव मांडला व तो मंजूर झाला. खांडेकर यांची अनेक दुर्मिळ छायाचित्रे, हस्ताक्षराचे नमुने, त्यांच्या वैयक्तिक वापराच्या वस्तू-पेन, टेबल इत्यादी मिळवून ते या दालनात संग्रहित करण्यात येणार आहे. खांडेकरांच्या साहित्याचे अभ्यासक व लेखक जया दडकर हे शताब्दी समितीचे सदस्य असून, त्यांनी या संग्रहालयाचा आराखडा तयार करून देण्याचे मान्य केले आहे. खांडेकरांच्या भाषणांच्या ध्वनिफिती ऐकवण्याची सोयही या दालनात उपलब्ध केली जाईल. तसेच हे नुसतेच संग्रहालय न राहता तेथे मराठी व अमराठी साहित्यिकांना विचारांची देवाणघेवाण करता यावी, वाङ्मयीन कार्यक्रम घडावेत, या दृष्टीनेही हे एक 'वाङ्मयीन केन्द्र' बनावे असा विचार आहे.

शताब्दीच्या निमित्ताने खांडेकरांवर प्रसिद्ध झालेले लेख, चर्चासत्रांतील निबंध मिळवून मांडले जाणार आहेत. तसेच खांडेकरांची छायाचित्रे, पत्रे ज्यांच्याकडे असतील ती त्यांनी पाठवावीत असे आवाहनही केले आहे. त्या दिशेने श्री नवलकर यांनी तात्काळ कार्यवाहीलाही आरंभ केला आहे.

शताब्दी समितीच्या या बैठकीस जया दडकर, शंकर वैद्य, मनोहर देवधर, अशोक जैन प्रभृती हजर होते.

माझ्या कविता शेतामधल्या निसर्गाशी निगडित : महानोर

"शेतामधला निसर्ग हा मानवाच्या प्रत्येक भावभावनेशी, जगण्याशी, सुखदुःखाशी निगडित आहे. माझ्या कविता या त्यातून आल्या आहेत. मग लोकगीतांनी, जात्यावरील

ओव्यांनी, खेड्यातील संपन्न परंपरेने या कवितांना आणखी समृद्ध केले आहे..."

ना. धों. महानोर यांच्यातील कवीने आपल्या कवितांमागील प्रेरणा प्रकट केल्या. हे हृद्य मनोगत सांगताना ते सहजतेने आपल्या कविताही गात होते. 'रानातील कविता'पासून ते अगदी अलीकडच्या 'पानझड'पर्यंतच्या आपल्या कवितांचा एक आढावाच त्यांनी या निमित्ताने घेतला आणि त्यांच्या मुक्तछंदातल्या मनोगताने साहित्यप्रेमी रसिकांना एक आगळाच आनंद अनुभवायला मिळाला.

याचे निमित्त होते खुद्द महानोरच. 'केशवराव कोठावळे पारितोषिक समिती'तर्फे देण्यात येणारे यंदाचे 'केशवराव कोठावळे स्मृती पारितोषिक' श्री महानोर यांना प्रसिद्ध कवी आणि समीक्षक प्रा. शंकर वैद्य यांच्या हस्ते देण्यात आले. त्यानंतर ते आपल्या भावना व्यक्त करीत होते.

"मला वाटले, ते लिहिले; मात्र या निसर्गाचे एवढे रंगरूप आहेत, त्याची जादू एवढी आहे, ते सारे शब्दबद्ध करणे केवळ अशक्य आहे. त्यात मला अपयश आले, असे प्रामाणिकपणे सांगावे लागेल." असे प्रांजळपणे सांगून ते म्हणाले, "गाणे आणि कविता हे सगळे मला खेड्याने, शेतीतील निसर्गाने, संपन्न लोकगीताने दिले. गाणे कोणत्याही ढंगाने लिहिताना त्याच्यातील कविता मी लोप पावू दिली नाही. लावणीच्या बाजूने जातानाही कवितेची उंची गाठण्याचा प्रयत्न केला. शेती हेच सर्वस्व आहे. त्यातील प्रत्येक घटना ही नवी असते. सगळे सुखदुःखाचे क्षण त्याच्यामुळेच अनुभवले. हे सारे कवितेत आणण्याचा प्रयत्न केला आहे. निसर्गाचे अनुभव संपले असे कधी होत नाही. त्याची अनेक रूपे आहेत. ते सगळे शब्दात पकडण्याचा थोडाफार प्रयत्न मी केला आहे. पराकोटीच्या दुःखाच्या वेळीही याच निसर्गाने आधार दिला आहे, आणि जगण्याची उमेदही त्याने दाखविली आहे. सगळे विश्व सुंदर करून टाकण्याची किमया त्याच्यात आहे."

श्रद्धांजली

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, साधना साप्ताहिकाचे संपादक आणि पत्रकार यदुनाथ थत्ते यांचे दिनांक १० मे रोजी सकाळी देहावसान झाले. ते ७६ वर्षांचे होते.

विविध सामाजिक विषयांवर सुबोध शैलीत लेखन करणाऱ्या यदुनाथजींनी महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रांमधून लेखन केले. मुस्लिम समाजाच्या प्रश्नांवर त्यांचे लेखनही गाजले. 'मुस्लिम समाजातील वाहते वारे' आणि 'मुस्लिम मनाचा कानोसा' ही त्यांची पुस्तके गाजली.

यदुनाथजी 'साधना'प्रमाणेच काही काळ औरंगाबादच्या 'मराठवाडा' दैनिकांचे संपादकही होते. 'मुल्कपरस्त' या नावाने ते 'मुशाफिरनामा' हा स्तंभही लिहीत असत.

कमलाबाई ओगले - महाराष्ट्राची लाडकी सासू

वाचकहो, आज आम्ही 'महाराष्ट्रातील दीड लाख सुनांची लाडकी सासू' असे ज्यांचे सार्थ वर्णन केले जाते, त्या कमलाबाई ओगले यांची अनौपचारिक मुलाखत सादर करीत आहोत. आमच्या सर्व वाचकवर्गास ही खास मेजवानीच ठरेल. पाकशास्त्रात प्रवीण होऊन यशाच्या शिखरापर्यंत पोहोचतानाच्या त्यांच्या प्रवासाचे काही टप्पे या मुलाखतीतून वाचकांपुढे मांडले आहेत.

कोणत्याही यशस्वी व्यक्तीमध्ये अखंड परिश्रम, कल्पकता, व विलक्षण जिद्द या गुणांचा संगम झालेला आढळून येतो. कमलाबाईही त्यास अपवाद नाहीत. पाककलेमध्ये त्यांनी सतत नवीन प्रयोग न थकता, न कंटाळता केले.

✦ **आपण पाककलेचे पहिले धडे कोणापासून घेतले?**

माझे लग्न पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे लहान वयातच झाले. माझ्या सासूबाईंना नवनवीन पदार्थ करून पाहण्याची हौस होती. त्यामुळे त्यांना मदत करतानाच मलाही त्यात गोडी वाटून लागली व मी स्वतःही जे काही खास पदार्थ आहेत उदा. सुतरफेणी, इमृती, विविध करंज्या, यात प्रावीण्य मिळवले.

✦ **आपली ही कला प्रथम लोकांसमोर कधी आली?**

मी मुंबईस रहायला आल्यानंतर खऱ्या अर्थाने माझ्या या कलेस वाव मिळाला. वनिता समाज भगिनी मंडळात खाद्यपदार्थांच्या स्पर्धा होत असत. मी प्रथम तेथे सर्व पारंपरिक पदार्थ करून पहिले पारितोषिक मिळवले. त्यावेळी इतर महिलांनी मला हे पदार्थ शिकवण्याची विनंती केली. त्यामुळे मी विविध पदार्थांचे वर्ग घेण्यास सुरुवात केली. माझे शिकवणे सर्वांना अतिशय पसंत पडत असे.

✦ **वेगवेगळे पदार्थ माहित करून घेण्यासाठी कोणकोणते प्रयत्न केले?**

मुंबईत मी गुजराती, पंजाबी, मद्रासी व्यक्तींकडे जाऊन त्यांच्याकडून त्यांचे पदार्थ शिकून घेतले.

✦ **पुस्तक लिहिण्यासाठी कोणी प्रवृत्त केले?**

माझी मुलगी बाळंतपणासाठी आलेली असताना मी तिला रोज वेगवेगळे पदार्थ करून घालत असे. तेव्हा ती म्हणाली की तू रोज एक पदार्थ मला सांग. मी लिहून घेईन. याप्रमाणे ३ महिन्यात खूप पदार्थ लिहून झाले. तेव्हा याचे एक पुस्तक तयार होईल असे वाटल्याने पुस्तक काढावे असे ठरवले.

✦ **पुस्तक लिहावे असे ठरल्यानंतर कोणत्या पद्धतीने मांडणी केली? त्यामागे कोणता विचार होता का?**

होय. आजकाल मुली शिक्षण घेऊन वेगवेगळ्या क्षेत्रात काम करताना दिसतात. शिक्षण घेत असताना त्यांना स्वयंपाकाची पुरेशी माहिती झालेली नसते. लग्न झाल्यानंतर एकदम स्वयंपाक करण्याची वेळ आल्यावर त्यांना मोठीच अडचण निर्माण होते. त्यामुळे अशा मुलींसाठी 'रुचिरा'त वरण कसे करावे पासून प्रत्येक गोष्टीची खुलासेवार माहिती दिली आहे. या मुलींची अडचण पुस्तकाने दूर व्हावी हा विचार पुस्तक लिहिताना मनात नक्की होता. त्यामुळेच सर्व वजन मापे ही घरगुती वाटी चमचा या स्वरूपात दिलेली आहेत.

✦ **पुस्तकाच्या प्रकाशनाबाबत प्रथम कोणत्या अडचणी आल्या?**

प्रकाशनासाठी अनेक प्रकाशकांकडे गेलो. परंतु तेव्हा कोणीही हे पुस्तक छापण्यास तयार झाले नाही. कारण मी काही प्रसिद्ध लेखिका नव्हते या विषयावरही फारसे कोणी लिहिले नव्हते. किर्लोस्करांनी हे पुस्तक स्वीकारले या पुस्तकाची मोठ्या प्रमाणावर जाहिरात केली.

✦ **पुस्तक प्रकाशित झाल्यावर त्यावरील प्रतिक्रिया काय होत्या?**

पुस्तकाला उत्तम प्रतिसाद मिळाला. प्रती हातोहात खपल्या. अनेकांची पत्रे आली. आजही लोकांची पत्रे येतात.

✦ **पुस्तक यशस्वी ठरल्यानंतर पुस्तकात अधिक सुधारणा केल्या का?**

मेहता प्रकाशनाकडे पुस्तक आल्यानंतर पुस्तकाचे स्वरूप अधिक देखणे झाले आहे. पदार्थांचे रंगीत फोटोमुळे पदार्थाची थेट कल्पना येते. लोकांच्या प्रेमामुळे दुसरा भागही प्रकाशित झाला. पुस्तक यशस्वी झाल्यानंतर महिलांच्या मागणीनुसार मी विविध पदार्थांची प्रात्यक्षिके व वर्ग घेण्यास सुरुवात केली.

✦ **प्रात्यक्षिकात आपण कोणते पदार्थ करून दाखवता?**

बाकरवडी, सुतरफेणी, म्हैसूरपाक, चिरोटे, बदामी हलवा, असे अनेक पदार्थ.

✦ **लोकांच्या प्रतिसादाबद्दल काही सांगू शकला का?**

अनेकांनी पत्रे पाठवली, रत्नागिरीचे एक गृहस्थ एकदा भेटायला आले. त्यांनी सर्व मसाल्याबद्दलची माहिती विचारली व सांगितले की आपल्या पुस्तकावरून मी मसाल्याचा मोठा व्यवसाय उभा केला आहे तो चांगला चालला आहे. तसेच अमेरिकेतील एक महिलाही पुस्तकावरून चकल्यांचा व्यवसाय करते. अशा प्रतिसादाने समाधान वाटते.

✦ **आपण परदेशात गेल्यावर काही नवीन उपक्रम केले का? तेथे प्रतिसाद कसा मिळाला?**

मी मुलाकडे ऑस्ट्रेलियास गेले असताना तेथील बायकांना आपले अनेक पदार्थ शिकवले. तेथील लोकांना आपल्याकडील पदार्थ खूप आवडतात. त्यामुळे प्रतिसाद चांगला मिळाला. म्हणून 'रुचिरा'चा इंग्रजी अनुवादही प्रकाशित करुन घेतला.

✦ **पाककला सोडून इतर कोणत्या क्षेत्रात प्रावीण्य मिळवले आहे?**

मी उत्तम बॅडमिंटन खेळत असे. तसेच भरतकाम, विणकाम, यात प्रावीण्य मिळवले

आहे. वनितासमाजमध्ये चैत्रमहिन्यात व नवरात्रात वेगवेगळ्या प्रसंगाची सजावट करत असत. या सजावटीत मी वेगवेगळे प्रसंग सादर केले.

✦ **आता शेवटचा प्रश्न. तुम्हाला कोणकोणती पारितोषिके मिळाली आहेत?**

वनिता समाजमध्ये ३ वर्ष सतत प्रथम पारितोषिक मिळवून ट्रॉफी मिळवली. इतरही अनेक पारितोषिक मिळाली आहेत. 'डॉटर्स ऑफ महाराष्ट्र'मध्ये माझा समावेश झाला आहे. रुचिराचे कानडी, इंग्रजी मध्ये अनुवाद झालेले आहेत. आतापर्यंत झालेल्या वाटचालीबद्दल मी पूर्ण समाधानी आहे.

२०% सवलतीत !

कर्तृत्ववान स्त्रियांची स्फूर्तिदायक चरित्रे

आय डेअर : किरण बेदी	अनु.: आशा कर्दळे	२००/–
माय स्टोरी : इनग्रिड बर्गमन	अनु.: आशा कर्दळे	३००/–
स्टेफी	अनु.: आशा कर्दळे	१००/–
प्रवाहातील पक्षी	निलू गव्हाणकर	७५/–

१५रु. पोस्टेजसह होणाऱ्या रकमेची मनीऑर्डर करा. पुस्तके त्वरित रजिस्टर पोस्टाने पाठवू.

पुस्तक परिचय

पुरुषसत्ताक समाजातील स्त्रीची कुंठित अवस्था

निर्बाचित कलाम

तसलिमा नसरिन

'निर्बाचित कलाम' हे नेहमीसारखे ललित लेखन नाही. तसलिमा नसरिन या व्यवसायाने डॉक्टर, तो अनुभव आणि धर्मग्रंथांचे वाचन, सामाजिक, वैचारिक लेखनाचे वाचन आणि आपला अनुभव या सगळ्याचा आधार असलेल्या स्फोटक लेखनाचा निर्बाचित कलाम हा संग्रह आहे. स्त्री ही या लेखनाच्या केंद्रस्थानी आहे. स्त्रीची आजवरची सगळी गुलामी, तिच्यावरचे सगळ्या पातळीवरचे अत्याचार यात धर्माचा वाटा सर्वाधिक, आधुनिक म्हणवणाऱ्या समाजातील तिची अवस्था, पुरुषसत्ताक समाजातली तिची कुंठित अवस्था या सगळ्या अन्यायावर त्या विजेसारख्या तुटून कोसळल्या आहेत. 'तुम्ही सर्वप्रथम माणूस व्हा' असे त्या स्त्रियांना कळवळून आणि संतापाने सांगत आहेत. धर्माचा बाजार मांडणाऱ्या मुल्ला मौलवींवर त्यांचा संताप आहे. बांगला देशात असल्याने मुल्लामौलवींवर टीका असल्याने आपल्याकडली काही मंडळी प्रसंगी आनंदित होताना दिसतात. पण ते काही फार परवडणारे नाही. आपलीही मंडळी यात कुठेच मागे नाहीत हे आपल्या परिचयाचे आहे. त्या अगदी 'स्त्री' संबंधातल्या विविध संबोधनांचा उल्लेख करत हे आपल्याला पटवून देतात. रमणी, गृहिणी, अंगना, पुरबाला असे संबोधनांचे दाखले त्या देतात. रामायण, महाभारत, उपनिषदे, पुराणे, बायबल या कशालाच त्यांनी मोकळे सोडलेले नाही. स्त्रीच्या अवस्थेचा विचार करताना त्यांनी प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक विचारांची शेखी मिरवणाऱ्या काळापर्यंतचा आलेख मांडला आहे.

या पुस्तकातील एक लेख आहे कॉम्रेड लेनिनवर. तो मुळातूनच वाचायला हवा. त्यात त्या म्हणतात, 'प्रातःकाळी स्मरावं अशा योग्यतेची ही व्यक्ती होती.' लेनिन म्हणाला होता, "स्त्रियांना दाबून ठेवलं जातं, घरात त्या घुसमटून जातात, मूढ बनतात, त्यांना किंमत दिली जात नाही, स्वयंपाक व बालसंगोपन या कामातच त्यांना घट्ट बांधून ठेवलं जातं. त्यांचे कष्ट अमानवी, अनुत्पादक, तुच्छ, संताप आणणाऱ्या, मनाला मरगळ आणणाऱ्या, हाडं ढिली करणाऱ्या कामांत खर्च होतात. या सर्व बेड्यांतून स्त्री मुक्त व्हावी हे माझं स्वप्न आहे." कॉम्रेड लेनिनचे हे स्वप्न प्रत्यक्षात आले नाही याची खंतही त्या व्यक्त करतात.

संग्रहातल्या ६९व्या या लेखाचा शेवट करताना, त्या म्हणतात : "आता लेनिन धुळीत पडलाय, त्याला शिखरावरून खाली ढकलून दिलंय. स्त्रीला विकाऊ वस्तू बनविण्याविरुद्ध, वेश्यावृत्तीविरुद्ध, स्त्रीच्या क्षुद्र, तुच्छ कौटुंबिक गुलामीविरुद्ध, इतिहासात जो स्वर सर्वात वरचा होता, तो लेनिनचा होता, जो हात सर्वात जास्त या कार्याला लागला होता, तो लेनिनचा हात होता. त्याच इतिहासाला आज नालायक लोकांनी पायाखाली तुडवलंय. यात नुकसान किती आणि कुणाचं झालंय मला माहीत नाही, पण स्त्रीचं नुकसान सर्वात जास्त झालंय, हे निश्चित."

आम्ही स्त्रिया, आज, पराभूत लेनिनसमोर, पराभूत आदर्शासमोर, पराभूत समानतेसमोर दुःखित मनाने नतमस्तक होतो.

तसलिमा भारतातही आल्या होत्या. इथल्याही परिस्थितीत त्यांना काही वेगळे अनुभवाला आले नाही. त्या एका ठिकाणी म्हणतात : "बायकांच्या पायातील बेडी फार मजबूत आहे. हातपाय गाळून बसून, कोणीतरी येऊन ही बेडी काढील, हे शक्य नाही."

"मुली आवडीनं पायात साखळ्या घालतात. साखळ्या घातल्यानं, बाई कुठे जाते, काय करते ते कळते. थोडक्यात, तिची सर्व हालचाल साखळ्यांच्या आवाजाच्या अनुरोधाने समजते. पण मूर्ख बायका मात्र त्यांना कैदी बनविणारा हा दागिना घालून, पायांचे सौंदर्य वाढवल्याच्या आनंदातच गर्क असतात." पती-पत्नी संबधातल्याही उच्चनीचतेवर त्या कोरडे ओढतात. 'साहेब' किंवा 'मालक' म्हणण्याची प्रथा, 'माझ्या नवऱ्याला मी नोकरी केलेली आवडत नाही,' असे कौतुकाने म्हणणाऱ्या स्त्रिया. अशा स्त्रियाच कशा स्वतःला गुलामाच्या पातळीवर आणतात याचाही त्यांनी उल्लेख केला आहे. त्यांनी हिंदू धर्मातल्या प्राचीन साहित्याचा जागोजाग केलेला उपयोग अवाक् करणारा आहे. जागतिक साहित्याचा, प्राचीन मिथकांचा, लोककथांचा त्यांनी घेतलेला आधारही मुळांतून वाचण्यासारखा आहे. भारतीय उपखंड हा त्यांच्या सर्वाधिक चिंतेचा विषय आहे. त्यामुळेच इथले कायदे, रीतिरिवाज याबाबत त्या कमालीच्या जागरुक आहेत. पाकिस्तानमधल्या कोर्टाच्या निर्णयावर त्यांचे

भाष्य अशाच एका लेखात (१९व्या) चांगल्याच उपरोधिक शैलीत व्यक्त झाले आहे.

एकूण सगळेच लेखन विचारप्रक्षोभक आणि स्त्री-पुरुष, हिंदू-मुस्लीम अशा सगळ्यांच्याच डोळ्यात अंजन घालणारे आहे. वेगवेगळे लेख वेगवेगळ्या कारणांसाठी आवडले. त्यातला ७४ क्रमांकाचा लेख तिच्या रुद्र नावाच्या मित्रावर आहे. रुद्र कवी होता. तिचा खूप जुना मित्र होता. प्रियकरच म्हणावा असा. त्याच्या मृत्यूवरचा हा लेख एका दीर्घ कवितेसारखा आहे. एक वेगळीच तसलिमा या लेखात भेटते. इतरही लेखही चांगले आहेत. पण या एका लेखासाठीही 'निर्बाचित कलाम' आपल्या संग्रहात असायला हवे. "एकेक अक्षर जोडून कविता करायला मला रुद्रनंच शिकवलं. माझ्या हातावर आपल्या बोटांचा हळुवार स्पर्श करीत हा रुद्रच मला म्हणाला होता, 'प्रेम आहे माझं तुझ्यावर! जीवनावर जीवन घासून आपण पेटवूया हृदयातील विलक्षण दीप आणि कृष्णपक्षात उजळून टाकू या पृथ्वीचे तीर!' रुद्रनंच मला स्वप्न पाहायला शिकवलं. मी फक्त नदीच पाहिली होती. रुद्रनं मला खवळलेला समुद्र दाखविला. गढूळ पाण्याची डबकीही त्यानं मला काही कमी दाखविली नाहीत! त्यानं मला पौर्णिमा दाखविली आणि अमावास्याही."

'निर्बाचित कलाम' आपण वाचावे यासाठी हा आग्रह करणारा संवाद.

–सतीश काळसेकर

निर्बाचित कलाम, पृष्ठे १४८, एकशेपन्नास रुपये

धार्मिक कडवटपणावर
हल्ला करणारी
क्रांतिकारक कादंबरी

लज्जा

अनु.: लीना सोहोनी

'लज्जा' ही तस्लिमा नसरिन यांची वास्तवावर आधारलेली कादंबरी. तस्लिमा या कवी म्हणून बांगलादेशात प्रसिद्ध आहेत. १९८६ साली त्यांचा 'शिकोरे विपुल खुदा' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आणि एक प्रतिभाशाली लेखिका म्हणून त्यांचे नाव सर्वतोमुखी

झाले. आतापर्यंत त्यांचे सात कवितासंग्रह तर पाच कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. 'लज्जा' ही सहावी कादंबरी. बांगलादेशातील मुसलमानांनी हिंदूंचा केलेला छळ आणि बांगलादेशावर प्रेम करणाऱ्या हिंदूंची केलेली कोंडी असा या कादंबरीचा विषय आहे. कादंबरीचा आशय खळबळजनक असल्याने तीवर सतत चर्चा होत आहे. केवळ चर्चेवरच हे प्रकरण थांबले नाही तर जातीय सलोखा बिघडत असल्याचा आरोप लेखिकेवर करण्यात आला आणि मूलतत्त्ववादी व जातीयवादी शक्तींच्या भयाने सरकारने या कादंबरीवर बंदी घातली व तस्लिमा नसरीन यांच्यावर टीका करण्यात आली. कडव्या मुसलमानांनी लेखिकेची हत्या करण्याचा फतवा काढला. तिच्या बंडखोर वृत्तीचे यथार्थ दर्शन या कादंबरीत घडले आहे.

बाबरी मशिदीचा विध्वंस झाला आणि जगातल्या मुसलमानांनी आपला संताप व्यक्त केला. त्याचाच एक भाग म्हणून बांगलादेशातील मुसलमानांनी तेथल्या अल्पसंख्याक हिंदूंचा अनन्वित छळ केला, त्याचे विदारक सत्य दर्शन या कादंबरीत झाले आहे.

माणूस ज्या देशात राहातो तो देश त्याचा असतो, तिथल्या जमिनीवर, निसर्गावर, माणसांवर तो प्रेम करीत असतो. पण देशापेक्षा जेव्हा धर्म श्रेष्ठ मानला जातो, त्यावेळी माणसांच्या देशप्रेमाची व्याख्या बदलली जाते. धर्म आणि जात या बाबी व्यक्तीपुरत्या सीमित असतात. पण मनुष्य धार्मिक अधिक असतो याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे डिसेंबर १९९२ मध्ये जगात उसळलेले हिंदू-मुसलमानांचे धार्मिक दंगे. वास्तविक पाहता बाबरी मशीद आहे भारतात, आणि ती भारतातल्या मूलतत्त्ववाद्यांनी नष्ट केली. या प्रकरणाचे पडसाद जगातल्या मुस्लिम देशातही उमटले. कारण नसताना बांगलादेशातील हिंदू मंदिरे उद्ध्वस्त केली गेली. हिंदूंवर अत्याचार केले. भारतातल्या हिंदूंनी मुसलमानांच्या अस्मितेवर घाला घातला असा समज करून घेऊन बांगलादेशीय हिंदूंवर तिथल्या कर्मठ मुस्लिम माणसांनी हल्ले केले. अनेकांची घरे जाळली, दुकाने फोडली. अनेक वर्षे शेजारीशेजारी राहाणाऱ्या हिंदू-मुस्लीम कुटुंबांमध्ये नाहक वितुष्ट आले आणि दोन कुटुंबामधला स्नेहभाव नष्ट होऊन वैरभाव वाढला. दोन समाज एकमेकांविरुद्ध शस्त्रे परजीत उभे ठाकले. या परिस्थितीचे चिंतन या कादंबरीत आहे. अनेकांना अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारी ही कादंबरी आहे.

बांगलादेशाच्या स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रप्रेमाने लढलेले सुधामयबाबू, त्यांचा मुलगा सुरंजन, त्यांची कन्या माया (निलोचना), त्यांची पत्नी किरणमयी अशा चारजणांच्या कुटुंबावर कोसळलेल्या संकटाची ही कथा आहे. बांगलादेशात उसळलेल्या दंगलीत बरेवाईट होण्याच्या आधीच दुसरीकडे निघून जावे असे मायाला वाटत होते. पण बांगलादेशात घडलेली १९५२ची भाषिक चळवळ, १९५४ची युनायटेड फ्रंटची निवडणूक, १९६२ची शैक्षणिक चळवळ, १९६६ची सहा कलमी चळवळ, आगरताळा कटाविरुद्ध निषेधाचा लढा, १९७१ सालचे बांगलादेशाच्या स्वातंत्र्याचे आंदोलन या सर्व राष्ट्रीय चळवळीत सुधामय स्वतः सहभागी

झाले होते. हिंदू असूनही मुस्लिमांबरोबर खांद्याला खांदा लावून लढले. राष्ट्रविरोधी शक्तींविरुद्ध आंदोलन केले, ते या राष्ट्रावर त्यांची निष्ठा होती म्हणून. अनेक मुस्लिम माणसांशी, कलाकारांशी, कुटुंबांशी त्यांचे घरोब्याचेच संबंध होते. "ही आपल्या वाडवडिलांची जमीन आहे, हिचा कधी त्याग नाही करायचा," अशी भूमिका सुधामयची होती. पण नाईलाज झाला म्हणून ज्या मालमत्तेची किंमत दहा लाख टका आली असती ती मालमत्ता व घर त्यांना भयापोटी केवळ दोन लाख टका किंमतीला विकावे लागले होते. घर सोडताना प्रत्येकालाच वेदना होणे साहजिकच होते. "या धर्मांध लोकांना चाबकानं फोडून काढलं पाहिजे. हे ढोंगी धर्ममार्तंड सगळे तोतया आहेत, धर्माच्या नावाने भडकावणारे." असा विचार सुरंजनच्या मनात सतत येत असे. लुन्कर, कैसर, अख्तारुज्जमनसारखे मुसलमान पुरोगामी आणि अल्पसंख्याक हिंदूंच्या बाजूचे होते. ते सुरंजन-सुधामयच्या कुटुंबाशी स्नेहाने वागत असत, पण हिंदूंना वाचविणे त्यांनाही शक्य होत नाही. अनेक वर्षांची मैत्री धार्मिक तेढीमुळे भंग पावली होता.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बांगलादेशाने राज्यघटनेत धर्मनिरपेक्षता मान्य केली होती. पण १९७५ नंतर त्या कलमाचे धिंडवडे निघाले होते. शाळांचे मदरसामध्ये रूपांतर झाले होते, रस्त्यांना असलेली हिंदूंची नावे बदलून मुस्लिमांची नावे ठेवण्यात आली होती. देशाला आर्थिक आधार राहिला नव्हता. हा असंतोष हिंदूंचा द्वेष करण्यास कारणीभूत ठरला. सुधामय-किरणमयींची वयात आलेली मुलगी माया हिला मुस्लिम गुंडांनी पळवून नेले होते. सुरंजनसारखा कलावंत, बुद्धिमान अभ्यासू तरुण मुसलमानांच्या छळवादाने विषप्राशन करण्याचा प्रयत्न करीत होता. जोय बांग्ला, बांग्ला जोय अशी गाणी गाणारे कुटुंब वेडेपिसे झाले होते. एक मशीद तोडल्याचा सूड म्हणून हिंदूंची भव्य कलाकुसर असलेली आलिशान मंदिरे नष्ट केली.

धर्म आणि देश या दोन गोष्टींमधून काय पसंत करायचे अशा मूलभूत प्रश्न उपस्थित करून या कादंबरीने तत्त्वज्ञानालाच हात घातला आहे. मूलतत्त्ववादी आपल्या कुटुंबाचा छळ करतात तरीही देशप्रेमाने, आदर्शवादाने भारावलेले हे कुटुंब जातीय सलोखा व्हावा म्हणून प्रयत्न करते. अनेक हिंदू कुटुंबे भयग्रस्त झालेली दिसत होती. भारतात निघून येण्याची त्यांनी तयारी केली होती. सुधामय कुटुंबाला देश सोडून द्यावा असे वाटत नव्हते. पण परिस्थिती विकोपाला गेली, अनेक मुलींवर अत्याचार झालेले पाहिले, अनेक सुंदर मुलींना देहविक्रय करताना पाहिले, हिंदूंची मानखंडना पाहिली आणि अखेर बांगलादेश सोडून भारतात येण्याचा निर्णय घ्यावा लागला. हा प्रकार लज्जास्पद होता. हिंदूंना आणि मुसलमानांनाही लाज आणणारा होता. या अर्थाने 'लज्जा' हे नाव लेखिकेने या कादंबरीला दिले आहे. धार्मिक कट्टरवाद व माणुसकी यांचा संघर्ष लेखिकेने प्रभावीपणे चितारला आहे. ह्या कादंबरीत हिंदूंची बाजू घेऊन मुसलमानांवर कठोर टीका केली आहे. त्यांची जुलमी मानसिकता चित्रित करून त्यांचा रोष पत्करला. म्हणूनच मुल्ला-मौलवींनी लेखिकेला ठार मारण्याचा फतवा

काढला. परंतु धर्माच्या नावाखाली दुसऱ्याचा छळ करणाऱ्या, एका जातीची हत्या करणाऱ्या व जातीयवाद पसरविणाऱ्या शक्तींविरुद्ध लढा पुकारण्याचा लेखिकेचा निश्चय आहे. 'लज्जा'ही कादंबरी ही सामुदायिक पराभवाची कथा असल्याचे लेखिकेचे मत सर्वांनाच मान्य होणार आहे.

एक धर्म दुसऱ्या धर्माशी समांतर असतो. सर्वच धर्मसंस्थापकांनी मानवतेचा संदेश दिला आहे. एक जात दुसऱ्या जातीशी मैत्रीनेच वागली पाहिजे. कुणी कुणाचा द्वेष करू नये. एखाद्याचे नुकसान करण्यासाठी आपली शक्ती खर्ची घालू नये, असेच तत्त्वज्ञान सर्व धर्मात सांगितलेले आहे. मग धर्माच्या नावाखाली जातीच्या अभिमानाने माणसामाणसांमध्ये भिंती घालणे अमानुषपणाचे आहे हे सूत्र प्रकर्षाने या कादंबरीत स्पष्टपणे रेखाटले असल्याने सर्वांनाच विचार करायला लावते. सर्व धर्मीयांचा क्रोध पत्करून धाडसाने सत्याचे दर्शन घडवून लेखिकेने एक क्रांतीच केली आहे म्हणूनच 'लज्जा' ही क्रांतिकारक कादंबरी आहे असेच म्हणायला हवे.

लज्जा, पृष्ठे २४५, शंभर रुपये

मायभूमीपासून तुटलेल्या माणसाची जीवघेणी परवड

फेरा

अनु.: मृणालिनी गडकरी

'लज्जा' या कादंबरीमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रकाशझोतात आलेल्या तस्लिमा नसरिन यांची 'फेरा' ही लघुकादंबरी मानवी भावविश्वाचे प्रत्ययकारी चित्रण करण्यात मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाली आहे. मानवी भावभावनांच्या सूक्ष्म छटा या कादंबरीत समर्थपणे टिपलेल्या आहेत. मायभूमीपासून तुटलेल्या माणसाची जीवघेणी परवड, मायभूमीच्या मातीशी असलेले त्याचे नाते, त्या मातीची ओढ उत्कटपणे चित्रित करण्यात ही कादंबरी निश्चित महत्त्वपूर्ण ठरलेली आहे.

फाळणीची पार्श्वभूमी या कादंबरीला आहे. मानवी मूल्यांचा होणारा ऱ्हास, धार्मिक विद्वेषाची माणसाच्या मनावर चढणारी पुटे, त्यातून लोप पावत जाणारी माणुसकी याचेही सुन्न करणारे दर्शन या कादंबरीतून घडते. आपल्या आवडत्या, सुंदर देशाची मूलतत्त्ववाद्यांनी केलेली भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक पातळीवरील अधोगती पाहून आक्रोशणारे लेखिकेचे मन वाचकांना अस्वस्थ करते. त्याचबरोबर अंतर्मुख होऊन विचार करायलाही प्रवृत्त करते.

बांगला देशातील मयमनसिंह येथे (पूर्वीच्या अखंड भारतात) एका हिंदू कुटुंबात जन्माला आलेली कल्याणी ही या कादंबरीची नायिका आहे. 'आनंदमोहन' या महाविद्यालयात शिकणाऱ्या कल्याणीचे तिच्याच वर्गातील एक गावंढळ तरुणावर (बादल) प्रेम बसते. आयुष्यभर एकमेकांना साथ देण्याच्या आणाभाका घेतल्या जातात. सुखी जीवनाची सुंदर स्वप्नं पाहण्यात तिचे दिवस जात असतानाच तिच्या जीवनात भयंकर वादळ येते. भारत-पाकिस्तानची फाळणी होणार, येथे आपल्या कुटुंबाला जगणे कठीण होणार म्हणून एके दिवशी अचानकपणे कल्याणीचे वडील (हरिनारायण राय) आपल्या मुलांना कलकत्त्याला पाठविण्याचा निर्णय घेतात. आपले गाव, तेथील निसर्ग, जीवलग मित्र-मैत्रिणी यांना सोडून जाणे कल्याणीच्या जीवावर आलेले असते, ती दडून बसण्याचा प्रयत्न करते, पण तिला तेथून पाठविले जाते. ती आपल्या भावंडासह मामा-मामींकडे कलकत्त्याला येते. येथे तिला मोलकरणीसारखी वागणूक मिळते. नातेवाईकांच्या वासनेने बरबटलेल्या नजरांना सामोरे जावे लागते. तिथे ती घरची कामं करून, महाविद्यालयात शिक्षण घेते. खासगी नोकरी करते. कलकत्त्यामध्ये तिचा परिचय अनिर्वाण या भारतीय तरुणाबरोबर होतो. परिचयाचे रूपांतर प्रेमात होते. बादल आणि आपले गाव, तेथील ब्रम्हपुत्रा नदी, तळे, विविध फळांची झाडं, हे तिच्या संवेदनशील मनावर कोरलेलेच असते. ते विसरणे तिला अशक्य होते.

मामा-मामींच्या जाचातून सुटण्यासाठी, नातेवाईकांच्या वासनांध नजरांतून बचाव करण्यासाठी एक उपचाराचा भाग म्हणून कोर्टात जाऊन ती अनिर्वाणबरोबर लग्न करते. त्यांचा संसार सुरू होतो. मात्र तिच्या डोक्यातून आपला देश, आपला गाव, तेथील माती, मित्र-मैत्रिणी यांच्या आठवणी तीव्रतेने येत असतात. तीस वर्षे ती या आठवणीवरच दिवस ढकलत असते. तिला दोन मुलं होतात. दरम्यान, तिचे आई-वडील दोघेही मरण पावतात. आता तेथे आपले कोणीही राहिले नाही याची खंत तिला दिवसेंदिवस अस्वस्थ करते.

आपल्या मैत्रिणीकडे जावे, जुन्या आठवणींना उजाळा द्यावा, असा विचार करून ती कशीतरी पतीची परवानगी घेऊन सहा-सात वर्षांच्या दीपनला सोबत घेऊन तीस वर्षांनतर ती बांगला देशातील मयमनसिंहला येते. पूर्वीचे वैभव तसेच असेल, आपले घर, ब्रम्हपुत्रा,

नदी, तळे, नारळ, पेरू, जांभळाची झाडं, मैत्रिणी पाहायला मिळतील, आपल्या मातीत काही दिवस तरी विसावता येईल, अशी कितीतरी स्वप्नं घेऊन ती आलेली असते.

मयमनसिंहला आल्यानंतर मात्र तिची घोर निराशा होते. तिचे घर सरकारने जप्त केलेले असते. ते घर पाडून तेथे सिमेंटची इमारत उभी केलेली असते. झाडं तोडलेली असतात. नदी आटलेली असते. नदीचे रूपांतर नाल्यात झालेले असते. तिला तेथे कोणी ओळखत नाही. तिचे म्हणून तिथे काहीच नसते. आपले घर असलेल्या जागेवर ती व्याकुळ मनानं रेंगाळते. मूठभर माती उचलून घेते. तिच्या घरासमोरचे जांभळाचे झाड मात्र अद्याप असते. असंख्य आठवणी दाटून येतात. ती त्या झाडाला कवटाळून ओक्साबोक्सी रडते. जमलेली माणसं 'वेडी' म्हणून तिला हिणवतात. तिची टिंगल करतात.

तिची बालमैत्रीण शरिफादेखील तिला ओळखत नाही. तिला भेटण्यासाठी तर ती एका देशातून दुसऱ्या देशात आलेली असते. तिच्या सर्व स्वप्नांचा चुराडा होतो. पंधरा दिवसांसाठी आपल्या देशात राहायला गेलेली कल्याणी दुसऱ्या-तिसऱ्या दिवशीच निराश मनाने आणि भरल्या अंतःकरणाने परत येण्यासाठी निघते.

या कादंबरीत लेखिकेने कल्याणीच्या भावजीवनाचे विविध छटांसह चित्रण केलेले आहे. हे भावविश्व त्या नायिकेपुरतेच मर्यादित राहात नाही तर मायभूमीपासून, मातीपासून तुटलेल्या माणसाचे ते प्रातिनिधिक चित्रण बनते. मानवी भावभावनांचा जिवंत आणि ज्वलंत आविष्कार या कादंबरीचा गाभा आहे. सरळ, साध्या अंतःकरणाला भिडणाऱ्या निवेदनामुळे या कादंबरीची परिणामकारकता वाढते. आठवणीच्या रूपाने निवेदन तंत्र वापरल्याने कथानकात काही ठिकाणी अवरोध निर्माण झाल्यासारखे वाटते. मात्र मूळ गाभ्याला हानी पोहोचत नाही. लहान लहान उदाहरणांमधून लेखिकेने मानवी मनाच्या बदलांचे प्रभावी चित्रण केलेले आहे. लहान मुलांच्या मनावर हिंदू लोकांविषयी द्वेष कसा बिंबविला जातो त्याचे अतिशय समर्पक उदाहरण लेखिकेने दिलेले आहे. काळ्या मुंग्या म्हणजे मुसलमान आणि तांबड्या मुंग्या म्हणजे हिंदू. काळ्या मुंग्यांना सोडून द्यायचे आणि तांबड्या मुंग्यांना मारायचे. या लहान मुलांच्या मुंग्या-मुंग्यांच्या खेळाचे उदाहरण सूचकपणे आणि मार्मिकपणे दिलेले आहे.

फाळणीमुळे केवळ भूप्रदेशच विभागला गेला नाही तर माणसा-माणसांची मनेही विभागली गेली आहेत, याचे विदारक चित्रण या कादंबरीत केलेले आहे. देश, प्रांत, प्रदेश येथील समानपणे बदलत जाणाऱ्या आणि वाह्यात बनत चाललेल्या तरुण पिढीसंबंधीचे वास्तव निरीक्षणही लेखिकेने स्पष्टपणे नोंदविलेले आहे. या कादंबरीतील नायिकेने उपस्थित केलेले प्रश्न (माणसांपेक्षा धर्म, देश, भाषा यालाच अधिक महत्त्व द्यावे का? माणूस धर्माचा गुलाम का बनतो? माणुसकीपासून दर का जातो?) वाचकांना अस्वस्थ तर करताताच पण

विचार करायलाही भाग पाडतात. उत्कट अनुभूती आणि मानवता केंद्रस्थानी ठेवून घेतलेला बदलत्या वास्तवाचा वेध यामुळे या कादंबरीला कलात्मक उंची प्राप्त झालेली आहे. ही छोटीशी कादंबरी प्रांताच्या धर्माच्या, भाषेच्या आणि देशाच्या सीमा ओलांडून व्यापक मानवतेचा विचार करते. म्हणूनच ती अनन्यसाधारण आहे.

या कादंबरीचा मृणालिनी गडकरी यांनी केलेला मराठी अनुवादही सहज, ओघवत्या भाषेत आहे. हा अनुवाद लेखिकेच्या भूमिकेला, कथानकाला न्याय देणारा असाच झाला आहे. जेथे आवश्यकता आहे आणि आशयाची गरज आहे, तेथे तेथे मूळ बंगाली शब्द जसेच्या जसे ठेवलेले आहेत. त्यांचा मराठी अर्थही दिलेला आहे. त्यामुळे ही कादंबरी वाचनीय झालेली आहे. बदलते वास्तव प्रसंग चित्रणातून साकार करण्याचे लेखिकेचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. या कादंबरीच्या अनुवादाने मराठी साहित्यात निश्चितच महत्त्वाची भर टाकलेली आहे.

-प्रा. दादासाहेब मोरे

फेरा, पृष्ठे ९०, साठ रुपये

झंझावाती
व्यक्तिमत्त्वाची
सुबोध ओळख

आय डेअर : किरण बेदी

अनु.: आशा कर्दळे

परमेश डंगवाल यांनी किरण बेदी यांचं 'आय डेअर' या शीर्षकाखाली चरित्र लिहिलेलं आहे. या मूळ इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद आशा कर्दळे यांनी केलेला आहे. आशा कर्दळे यांनी केलेला हा अनुवाद अर्थवाही आणि सहानुभवाचा अनुभव देणारा उतरलेला आहे. अनुवाद कुठेही दुर्बोध आणि निरस वाटत नाही.

परमेश डंगवाल यांनी वर्तमानपत्रे, विविध ठिकाणी छापून आलेले अभिप्राय, किरण बेदी यांच्या सहवासात आलेली माणसं, त्यांची मतं, मनोगत यांचा उपयोग करून घेतलेला

आहे. स्वतः किरण बेदी यांनीही आपली परखड मतं निर्भीडपणे मांडलेली आहेत. त्यांच्या आई-वडिलांनीही आपल्या मुलीचं चरित्र लिहिलं जातंय कळताच किरण बेदींच्या बालपणीच्या आठवणी, माहिती आणि काही अनुभव त्यांना शक्य असेल ती मदत केलेली आहे. असा चहूबाजूंनी मदतीचा स्त्रोत येऊन त्यांची आखीव बांधणी करण्याचे काम चरित्र लेखकानं उत्तम प्रकारे केलेलं आहे. 'आय डेअर' वाचत असताना फार फापटपसारा जाणवत नाही. वर्णने आणि माहिती नेमकी आणि आवश्यक तीच उचलून त्याची योग्य प्रकारे मांडणी केली गेलेली आहे. व्यक्ती जितकी महत्त्वपूर्ण तेवढी सामान्यांची उत्सुकताही अधिक असते. समाजातील तळागाळातील लोकांपासून ते उच्चशिक्षित लोकांपर्यंत सर्वांना 'किरण बेदी' या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाची भुरळ पडलेली आहे आणि तशी भुरळ पडणं यात काही गैर काही नाही. उच्चपदविभूषित स्त्री म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं आकर्षण सर्वांना आहेच.

किरण बेदी या एक स्त्री आहेत आणि त्यांनी सर्वसामान्य स्त्रीत्वाशी निगडित असणाऱ्या विचार, मतांना आव्हान देत आपल्या जगण्याची एक वेगळी पाऊलवाट बनवलेली आहे. उत्तम प्रकारची टेनिसपटू असणाऱ्या किरण बेदींनी आपलं करिअरही चोखंदळपणे निवडलेलं आहे. या आपणहून निवडलेल्या व्यवसायातील चढउतार, मानापमानही खिलाडून वृत्तीनं घेतलेलं आहे हे त्याचं चरित्र वाचताना जाणवत जातं. खेळायला मैदानात उतरल्यावर, उतरायचं ते जिकेनच या जिद्दीनं, त्याच जिद्दीनं आणि वृत्तीनं त्यांनी शासकीय सेवेतील आपली कारकीर्द घालवलेली आहे. चिकाटी आणि जिद्द यामुळे त्याचं मनोबल कधी खचताना दिसत नाही. जिथं जाऊ तिथं आपल्या ताकदीनं प्रश्न सोडवण्याची हिंमत त्यांनी ठेवली आणि त्यात त्यांना कालांतरानं अपेक्षित असलेलं यश गवसत गेलं.

उच्चपदावर आणि तेही एका स्त्रीनं असावं हे आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीला भावणार नव्हतंच. त्यांचा जम बसतोय, त्यांच्या पद्धतीनं त्या प्रश्न सोडवण्यात यशस्वी होतायेत दिसताच त्यांची उचलबांगडी केलेली दिसून येते, पण वळणावळणांवर त्यांनी लढा दिलेला दिसून येतो. सहजासहजी हार मानणं, उदास होणं हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भागच नाही. बुजणे हा स्वभावाचा स्थायिभावच नाही. निर्भीडता ठसठशीतपणे ठायी-ठायी दिसून येते, मग सेवेची निवड असो, प्रशिक्षणाचा काल असो, वकिलांचा संप असो, की स्वतःच्या मुलीची मेडिकलची ॲडमिशन असो. एका वरच्या व्यापक स्तरावरून त्या प्रश्नाकडे पाहताना दिसतात. त्यांच्या मुलीच्या मेडिकलच्या ॲडमिशनचा प्रश्न हाताळताना, लढा देताना तो प्रश्न किरण बेदी आणि त्यांची मुलगी इतक्याच वैयक्तिक पातळीवर प्रश्न राहात नाही तर शासकीय सेवेत असणाऱ्या कुठल्याही ऑफिसरपुढचा तो प्रश्न उरून राहतो. स्वतःसाठी लढताना इतरांसाठीही लढण्याची शक्ती यात येऊन मिसळते आणि प्रश्नाचं महत्त्व वाढतं, निकड

लक्षात येत जाते. वळणावळणावर आपण लढत राहिलो याचं फार सुरेख समर्थन त्या देतात. किरण बेदी म्हणतात : वाद, त्रास, दगडफेक, तीव्र विरोध या गोष्टी मला नवीन नाहीत. जेव्हा मी माझे आयुष्य भारतीय पोलिस सेवेसाठी वाहून घेतले तेव्हाच मी या गोष्टीचा स्वीकार केला होता. हे सर्व नशिबाचा अटळ भाग म्हणून स्वीकारलं होतं.

इतकी स्पष्ट जाणीव असल्यावर पश्चात्तापाचा क्षण अवतरणं कठीणच! मुलीच्या मेडिकल ॲडमिशनचा प्रश्न हा लढा आपण का दिला सांगताना त्या म्हणतात, 'शेवटी भारतात लोकशाही आहे, हुकूमशाही नाही. कुठेही जाण्याचे आणि आवडेल तिथं काम करण्याचे स्वातंत्र्य नागरिकाला आहे आणि ते तुम्ही चिरडून टाकू शकत नाही.'

त्यांच्या कामाच्या जागा बदलल्या, डिपार्टमेंट्स बदलली, गावं बदलली, प्रदेश बदलले. कधी दिल्ली तर कधी मिझोरम, कधी गोवा तर कधी तिहार तुरुंगासाठीची निवड, पण वरून आदेश येताच त्या विविध ठिकाणी आपण स्वीकारलेल्या सेवेचं स्वरूप ओळखून तिथं न कुरकुरता मुलगी आजारी असतानाही गेल्या. नुसत्याच आदेशानुसार गेल्या नाहीत तर त्यांनी आपली कुवत सिद्ध केली. तन मन धन अर्पून काम करणे म्हणजे काय याचं त्या उत्तम उदाहरण आहेत.

तिहार तुरुंगातील त्यांची कामगिरी जागतिक पातळीवरही प्रशंसनीय ठरली ही केवढ्या अभिमानाची बाब आहे. 'क्षमा' हे मानवी मूल्य मानून गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याची आठवण न व्हावी, व्यसनापासून त्याची मुक्ती व्हावी यासाठी त्या कार्यरत राहिल्या. असंख्य कैद्यांना तुरुंग हा तुरुंग वाटेनासा व्हावा, इतका बदल त्यांच्यात मानसिक पातळीवरून घडवून आणला. ही विलक्षण आश्चर्यजनक घटना मानावी लागेल. योग, काम आणि विपश्यना यामुळे कैद्यांत आमूलाग्र बदल घडवून आणला. पण दुदैव त्या कैद्याचं की किरण बेदींची तिथून बदली होताच सर्व पूर्ववत उरलं. तुरुंग तुरुंगच उरला.

बाहेरच्या जगानं त्यांच्या कार्याची दखल घेतली. मॅगेसेसे पुरस्कार देऊन त्यांचा आणि त्यांच्या कार्याचा गौरव केला. एक शासकीय अधिकारीही काय करू शकतो हे त्यांनी दाखवून दिले.

शासकीय सेवेत राहून आपल्या अधिकाराचा वापर करून विधायक कार्य करणारी किती माणसं असताता? जवळ जवळ एक टक्का! किरण बेदी निश्चितच त्यातील एक आहेत. आपल्या उच्चपदाचा आपल्याच उन्नतीसाठी त्यांनी कधीही वापर केलेला नाही की कसल्या सुविधा पदरी पाडून घेतल्या नाहीत. शासकीय अधिकाऱ्यांची एक वेगळी प्रतिमा जनमानसात निर्माण केली.

'आय डेअर' हे चरित्र विचारी आणि महत्त्वाकांक्षी स्त्रियांना दीपस्तंभासारखं मार्गदर्शक

ठरणारं आहे. धीर देणारं आहे. वाटाड्या ठरावं या लायकीचं आहे. माणसानं स्वतःच्या कार्याशी, प्रेरणेशी, विचारांशी प्रामाणिक राहावं शिकवणार आहे.

'स्त्री ही दुबळी असते' हा समज हे चरित्र वाचून कसा चुकीचा आहे ते लक्षात येतं. स्वतःची क्षमता स्वतः ओळखायला हवी आणि धाडसानं आपल्या विचारांना, त्यांना कृतीची जोड देण्याची प्रेरणा हे चरित्र वाचून मिळेल.

भारताच्या शासकीय इतिहासात किरण बेदी यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होणार हे सत्य आहे. त्यांचे काही विचार, मत किती बोलकी आणि अचूक आहेत बघणं फायद्याचं ठरणारं आहे.

"मूल्य व्यवस्थेची झपाट्यानं अधोगती होत असताना सरकारी नोकरीत निर्भय माणसांची फार मोठी गरज आहे असे मला वाटते. अशा निर्भय माणसांनी वरिष्ठांची अनावश्यक खुशामत न करता, आपली मते मोकळेपणाने आणि निर्भयपणे बोलली पाहिजेत."

"स्वतःच्या आयुष्याचा ताबा जे लोक घेत नाहीत, त्यांच्यावर काळ लाठीमार करीत असतो."

आपल्याला 'आय डेअर' वाचून आनंदानं नमूद करावंसं वाटतं की, किरण बेदी यांनी स्वतःच्या आयुष्याचा ताबा घेतलेला आहे. त्यांचं चरित्र सांगतं की तुम्हाला वाटतं तसं जगा, इतरांना वाटतं तस जगू नका.

स्वतःच्या प्रेरणा, शक्ती, अवलोकन क्षमता याचा अंदाज घेऊन कुठल्याही व्यक्तीनं निर्णय घेतला तर त्याला पश्चात्तापाची वेळ येत नाही आणि अपयश आलं तरी त्याची पावलं डळमळत नाहीत. कारण यशाच्या मार्गावरचं अपयशही एक अपरिहार्य ठिकाण असतं. अपयशाजवळ यशाचा प्रवास संपत नसतो. तो त्या क्षणाला ओलांडून पुढे जातो.

नव्या तरुण, सुशिक्षित स्त्रियांपुढे अशी चरित्रं आली पाहिजेत. त्यांच्या वाचनाने हिंमत वाढते. स्वप्न पाहणाऱ्या, उमेद बाळगणाऱ्या स्त्रियांना किरण बेदी यांचं चरित्र निश्चितच मार्गदर्शक ठरणारं आहे. त्यांच्यावर उठलेली वादळं, झालेली बदनामी यानं त्या खचून गेल्या नाहीत. आरोप सोसून गप्प राहिल्या नाहीत तर त्यांनी आपली बाजू वरिष्ठांपुढंही ठेवली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हा अन्याय न सोसण्याचा पैलू विलोभनीय आहे. कुठं वाकावं आणि कुठं स्वतःसाठी ताठ रहावं दाखवणारा आहे.

तरुण स्त्रियांनी वाचावं – चिंतन करावं असंच किरण बेदींचं चरित्र आहे.

–'आय डेअर' – किरण बेदी, पृष्ठे २५६, दोनशे रुपये

वेगवेगळ्या व्यवसायांची आकर्षक आणि प्रेरक तोंडओळख

व्यवसाय मार्गदर्शक

अनु.: मीना किणीकर

एकविसाव्या शतकाकडे वेगाने झेपावणाऱ्या जगाने पूर्वी कधीही नव्हती अशी आव्हाने आजच्या तरुणवर्गापुढे उभी केली आहेत; त्याचबरोबर पूर्वी कधीही नव्हत्या इतक्या विविध क्षेत्रात पराक्रम दाखवण्याच्या संधींची आकर्षक अशी प्रलोभनेही डोळ्यांपुढे तरळती ठेवली आहेत. "अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन आशा, किनारा तुला पामराला" या उक्तीची सार्थता पटवणारे वातावरण चौफेर आहे. बिल गेटससारखा तरुण हार्वर्ड विद्यापीठातील आपला पदवीचा अभ्यासक्रम अर्धवट सोडतो आणि संगणकाचा वापर सुकर करण्याची जी युक्ती सुचली तिच्या विकासासाठी चार मित्रांबरोबर स्वतःचीच कंपनी काढतो. अवघ्या दहा वर्षात तो अमेरिकेतला सर्वात श्रीमंत माणूस होण्याएवढी मजल गाठतो. त्याचा मायक्रोसॉफ्ट विंडोज् हा कार्यक्रम जगातल्या नव्वद टक्के संगणकांना वापरावा लागतो; आणि वर्षाकाठी त्याला अब्जावधी डॉलर्स त्यामुळे मिळतात. नवीन कल्पना हव्या, नवे तंत्र गवसायला हवे, आणि ते उत्तम प्रकारे मार्केटिंग करून लाभ पदरात पाडून घेण्याचे कौशल्य हवे. एकविसाव्या शतकातील अपरिमित संधींमुळे शेकडो बिग गेटस तयार होतील; आणि शंभर दीडशे वर्षे पारंपरिक उद्योगधंदा करून ज्यांनी संपत्ती मिळवली, त्यांच्यावरही ते वरताण करू शकतील.

पूर्वी ठराविक अभ्यासक्रम असत, ठराविक विषय असत; उद्योगधंद्यांचीही मर्यादित दालने खुली असत. आता तसे जग संकुचित व चाकोरीबद्ध राहिलेले नाही. त्यामुळे सगळी हुशार मुले पूर्वी इंजिनियरिंग आणि डॉक्टरकी यांच्या मागे धावत, तशी परिस्थिती आज उरलेली नाही. आज अनेक पर्याय समोर आहेत, आणि ते सर्व भरपूर पैसा आणि मानसन्मान देणारे आहेत.

दहावी, बारावी किंवा पदवीधर झाल्यावर आपल्या आवडीचा अभ्यासक्रम व जीवनक्रम निवडण्याची आज मोकळीक आहे. विद्यापीठांप्रमाणेच इतरही संस्थांतून प्रशिक्षणाच्या उत्तम सोयी आहेत; आणि व्यावसायिक शिक्षणानंतर नोकरीही मिळणेही अवघड ठरत नाही. अर्थात

आपल्या अंगी असणारे कौशल्य, आपली स्वाभाविक आवड, आपल्याला जमणाऱ्या गोष्टी, आपली बौद्धिक व शारीरिक कुवत, आपली जीवनाबद्दलची व प्रतिष्ठेबद्दलची कल्पना या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच आपल्याला सोयीस्कर ठरेल असा अभ्यासक्रम व जीवनक्रम निवडण्यात शहाणपण आहे. आपल्याला न आवडणारा, न झेपणारा, न जमणारा अभ्यासक्रम घरच्या व वडीलधाऱ्यांच्या आग्रहाखातर निवडून, नंतर पस्तावत बसणे इष्ट नाही. वेळीच आपण काय करायचे ते ठरवणे, नको ती भीड टाळणेच इष्ट होय.

अभ्यासक्रमांची उपलब्धता, प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, प्रवेशाच्या व पात्रतेच्या अटी, लागणारे शुल्क इत्यादी माहिती असणे त्यामुळेच आवश्यक ठरते. व्यवसाय मार्गदर्शक हे मूळ इंग्रजीवरून मराठीत आणलेले पुस्तक ही गरज चांगल्या रीतीने भागवू शकेल असेच आहे. जयंती घोष यांचे दि करीयर गाईड हे युबीएसने काढलेले पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसने मराठीत प्रसिद्ध करून तरुण वर्गाची मोठीच सेवा केली आहे.

या पुस्तकात ६५ अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आली आहे. त्यात हवाई सुंदरी, सौंदर्यतज्ज्ञ, नृत्य, फॅशन, संगीत चित्रपट, रत्नांची पारख, अंतर्गत सजावट, मॉडेलिंग, नर्सिंग, अभिनय, ललित कला या सारखा ग्लॅमरस अभ्यासक्रमांचा समावेश आहे तसाच संगणक, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, वन संवर्धन शास्त्र, जैव तंत्रज्ञान, व्यापारी वैमानिक, दुग्धव्यवसाय, आहारतज्ज्ञ, हॉटेलव्यवस्थापन, आग अभियांत्रिकी, मतिमंद-पुनर्वसन, समांतर वैद्यकीय व्यवसाय, फोटोग्राफी, प्लॅस्टिक अभियांत्रिकी व तत्त्वज्ञान, प्रकाशन, पत्रकारिता, रोखे दलाली, समाजसेवा, पर्यटन अशा वेगवेगळ्या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रशिक्षणाच्या माहितीचाही समावेश आहे. त्यामुळे हे पुस्तक बारकाईने वाचल्यास प्रत्येक तरुणाला आणि त्याच्या पालकांना फायदा होऊ शकेल. कारण भरपूर माहितीचा खजिनाच या पुस्तकात भरलेला आहे. हे सर्व अभ्यासक्रम पारंपरिक विद्यापीठीय परीक्षांपेक्षा बहुतांशी वेगळे आहेत; आणि तरीही ते झटपट नोकरी व पैसा मिळवून देणारे आहेत. स्वतःचा व्यवसाय सुरू करायलाही ह्या माहितीचा उपयोग होऊ शकेल.

व्यापारी वैमानिक (कमर्शियल पायलट) म्हणजे प्रवासी वा माल किंवा दोन्ही वाहून नेणारे विमान चालवतो. त्यासाठी अभ्यास कुठे करावा लागतो? तशा सोयी कुठे आहेत? याबद्दलचे प्रकरण वाचताना लक्षात येते की प्रथम सरकारमान्य फ्लाइंग क्लबमधून शिकाऊ वैमानिकाचा परवाना मिळवावा लागतो. (SPL) त्यासाठी अटी काय? तर किमान वय सोळा व मॅट्रिक पास. त्यानंतर खाजगी वैमानिकाचा परवाना (प्रायव्हेट पायलट लायसन्स - पी पी एल) मिळवण्यासाठी प्रशिक्षकाबरोबर प्रथम १५ तास विमान चालवावे लागते. एकूण ६० तासांपैकी ५ तास देशांतर्गत आणि २० तास एकट्याने उड्डाण करावे लागते. त्यासाठी बारावी उत्तीर्ण आवश्यक. आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज एस्टॅब्लिशमेंटकडून शारीरिक तंदुरुस्तीचा

दाखला लागतो. पीपीएलनंतर कमर्शियल वैमानिक परवाना (SPL) मिळू शकतो. त्यासाठी १९० तासांचा उड्डाणाचा अनुभव लागतो. इंदिरा गांधी राष्ट्रीय अर्बन ॲकॅडमी, फुरसतगंज, रायबरेली येथे वैमानिकचे प्रशिक्षण मिळते. सीपीएलचा अभ्यासक्रम १८ महिने मुदतीचा असतो. वैमानिक बनेपर्यंत ४/५ लाख रुपये खर्च करावे लागतात. पण महिना वेतन ५० हजारावर मिळते... ही सर्व माहिती वाचल्यावर सुदृढ तरुणांना आपणही वैमानिक व्हावे असे वाटल्याशिवाय राहील का?

या पुस्तकात दिलेली माहिती अशी नेमकी व प्रेरणादायक आहे. त्यामुळे हे पुस्तक आपल्या आवडत्या अभ्यासक्रमाची निवड करण्यासाठी सोयीचे ठरेल.

या पुस्तकाला जोडलेल्या पुरवण्याही महत्त्वाच्या आहेत. दूरशिक्षण देणाऱ्या पन्नाससाठ संस्था आहेत. अमेरिकेत शिक्षणासाठी जायचे असेल तर काय पूर्वतयारी लागते त्याची माहिती एका परिशिष्टात आहे. वर्षाला १० ते २५ हजार डॉलर्स खर्च अमेरिकेत येतो. व्यक्तिमत्त्व चाचणीत समूह चर्चा, मुलाखत यांचे ज्ञान उपयुक्त ठरते. व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीनेही काही पथ्ये पाळावी लागतात. नऊशे संस्थांचे पत्तेही शेवटी दिले आहेत. अभ्यासक्रमांचे, व्यवसायाचे गटही कसे पाडता येतील त्याची कल्पना दिली आहे. थेट नोकरीच्या दृष्टीने उपयुक्त कोर्सेसची यादीही महत्त्वपूर्ण आहे.

आजच्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या आणि जागतिकीकरणाच्या काळात उपलब्ध असणाऱ्या संधींचे हे तपशील उत्साहवर्धक व प्रेरणादायी ठरतील.

–शंकर सारडा

व्यवसाय मार्गदर्शक, पृष्ठे ३२६, शंभर रुपये

दै. देशदूत 'कथा स्पर्धा'

सध्या मराठीत मासिकांची संख्या कमी झाल्यामुळे कथा छापण्याचे प्रमाणही मंदावले आहे. कथा लेखकांना आपल्या कथा प्रसिद्ध करणे त्यामुळे अवघड होते. प्रकाशकही कथासंग्रह काढायला उत्सुक नसतात. वाचकांनाही त्यामुळे चांगल्या कथा वाचायला कमी मिळतात. ही कोंडी फोडण्यासाठी दै. देशदूतने दररोज एक कथा प्रसिद्ध करण्याचे ठरवले आहे. नवीन लेखकांच्या कथांनाही त्यात स्थान मिळावे म्हणून एक कथा स्पर्धा जाहीर करीत आहोत. कथा २००० शब्दांपर्यंतची, स्वतंत्र अप्रकाशित असावी. विज्ञान कथा, विनोदी कथा यांचाही खास विचार केला जाईल. पहिल्या पाच क्रमांकांना अनुक्रमे रुपये एक हजार, पाचशे, तीनशे, दोनशे व शंभर अशी पारितोषिक देण्यात येतील. उत्तेजनार्थही काही कथा निवडल्या जातील. **कथा पाठवण्याची मुदत २० जुलै १९९८.**

आमचा पत्ता : **कथा विभाग, शंकर सारडा, संपादक, दैनिक देशदूत**
५९, नवी पेठ, शास्त्री रोड, पुणे-४११०३०. फोन : ५३८६५१, ५३८६६१

राजकीय वास्तवाचे भेदक चित्रण

तंतू

अनु.: उमा कुलकर्णी

'तंतू ही कादंबरी म्हणजे, खरं तर, एका संपादकाची घुसमट आहे. पण त्यात त्याचं जग त्याचं वैयक्तिक जग राहात नाही. त्याचे रागलोभ, विचार, समस्या ह्या प्रादेशिक सीमारेषांना भेदून सार्वत्रिक बनतात. यात दिल्ली, बनारस इथेही ठळकपणे घटना घडतात आणि जे वैयक्तिक प्रश्न या कादंबरीच्या नायकाला म्हणजे संपादकाला पडले आहेत किंवा नायिकेला म्हणजे त्याच्या महत्त्वाकांक्षी बायकोला पडतात ते केवळ वैयक्तिक न राहता विश्वरूपी होऊन उरतात. जसे काफ्का, कामू किंवा सार्त्रच्या कादंबऱ्यातून होत राहतं. या कादंबरीतला संपादकाचा मुलगा अनुप या शहरी आणि निर्बुद्ध शिक्षणप्रणालीच्या चरकातून बंधनातून वाया जाऊ नये म्हणून बाहेर काढल्यावर तो त्याच्या स्वतंत्र विचारशक्तीचा, त्याच्या अंगातल्या नेतृत्वगुणांचा आविष्कार करतो. त्यांचं वर्णन भैरप्पा ज्या सहजपणे करतात ते वाचल्यावर सरकार शिक्षणक्षेत्रात काय करतंय आणि आपण काय करावं याचा आदर्श धडाच भैरप्पा घालून देतात.

या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहेत पत्रकार रवींद्र, त्याची पत्नी कांती आणि मुलगा अनुप. रवींद्रच्या ध्येयवादी आणि तत्त्वनिष्ठ पत्रकारितेच्या अनुषगानं ज्या घटना समोर येतात त्यामधून देशातील जातिनिष्ठ, नीतिभ्रष्ट, संकुचित आणि स्वार्थी समाजजीवनाचं दर्शन घडतं. रवींद्रचे वडील दिल्लीतील केंद्रीय शासकीय विभागाचे सचिव. अतिशय प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्याची तत्त्वशून्य आणि भ्रष्टाचारी प्रशासन व्यवस्थेत जी ससेहोलपट होते तेच जीवन रवींद्रचे वडील अप्पा यांच्या वाट्याला आलेलं. रवींद्रचे आजी-आजोबा व्यंकटसुबय्या आणि शांतम्मा निःस्पृह, दानशूर आणि ध्येयवादी. कुटुंबाचा उज्ज्वल वारसा चालविण्याची जिद्द आणि ध्येयनिष्ठ वृत्ती रवींद्रच्या स्वभावात पुरती बाणलेली आहे. कांतीचे

वडील बडे सरकारी इंजिनीअर. आपल्या अधिकारपदाच्या कारकीर्दीत प्रचंड माया जमवण्याच्या छंद त्यांनी जोपासला होता. अशा अधिकाऱ्याला सर्वच स्तरावरून सहकार्य लाभतं. त्याचा नावलौकिक होतो. कांतीला अशा पैशाच्या बळावर लाभणाऱ्या ऐश्वर्याची विलक्षण ओढ. आपल्या नवऱ्याला 'गांधीज्वरानं' पछाडलेलं आहे याची तिला विलक्षण खंत वाटते. कांतीच्या स्वतंत्र, स्वैर आणि काहीशा बहकलेल्या व्यक्तिरेखेमुळं दिल्ली येथील पैसा आणि सत्ता यांच्या मागं कोणताही विधिनिषेध न बाळगता पिसाटपणे धावणाऱ्या श्रीमंत आणि सत्ताधारी समाजाचं विदारक दर्शन घडतं. अनुप या लेकावर कोणते संस्कार व्हावे याबाबतीत पतीपत्नीमध्ये प्रारंभापासूनच मतभेदाला सुरुवात होते. सुरुवातीला पॉकेटमनी आणि तरुण वयात हातात खेळणारा पैसा यामुळं अनुपसारख्या बुद्धिमान, कर्तबगार तरुणाची जीवननौका कशी भरकटत जाते याचंही प्रत्ययकारी चित्र लेखकानं रेखाटलेलं आहे. अनुपच्या व्यक्तिरेखेमुळं देशातील एका आदर्श शिक्षणसंस्थेचं स्वरूप जसं पाहायला मिळतं त्याचप्रमाणं कॅपिटेशन फीच्या प्रभावामुळं नीतिमूल्यांना मूठमाती देणाऱ्या आधुनिक शिक्षण पद्धतीचं भयानक चित्रही आपल्यासमोर येतं.

माखनलाल रांका या गांधीवादी आणि निःस्पृह, रामशास्त्री बाण्याच्या उद्योगपतीनं चालविलेल्या 'इंडियन ट्रिब्यून'च्या दैनिकाचा रवींद्र हा संपादक. खादीधारी आणि गुंड प्रवृत्तीच्या नेत्यांनी घातलेला हैदोस, मंत्र्यांशी हातमिळवणी करून ग्रॅनाईटचा राजरोस काळाबाजार करून कोट्यवधी रुपयांची अवैध कमाई करणारे आमदार-खासदार, मातृभाषा आणि संस्कृती याकडे पाठ फिरवून इंग्रजी भाषा आणि नवी संस्कृती या नावाखाली विकृतीचं भीषण दर्शन घडविणारे तथाकथित सुशिक्षित हे या नवभारताचं विदारक चित्र. रवींद्र आपल्या वृत्तपत्रामधून या दुष्ट आणि अनिष्ट विकृतीचा बुरखा फाडून सामाजिक आणि राजकीय जीवनाचं बेगडी, ढोंगी स्वरूप उघड करतो. ही कादंबरी वाचकाला अंतर्मुख करते. अनेक प्रश्न व अस्वस्थता निर्माण करते.

भैरप्पांची काही निरीक्षणे वाचली. म्हणजे वैचारिक दृष्ट्या ते किती उंच पातळीवर आहेत हे स्पष्ट होईल...

'लाच खाल्लेल्या पैशातून काहीही करता येतं! पण ज्याची फक्त प्रामाणिक कमाई आहे त्याने मात्र अंथरुण बघूनच पाय पसरायला पाहिजेत....'

उच्चपदस्थातील भ्रष्टाचाराने बडबडलेल्या या देशात जे प्रामाणिकपणे जगताहेत त्यांची ही सहवेदना नाही काय?

'...प्रत्येकाला केवढी जागा हवी यावर, ती गोष्ट मृतदेहाला पुरायची पद्धत असलेल्या देशात लिहिली गेली असल्यामुळे 'सहा हात लांब जागा' हे उत्तर दिलं गेलं. आपल्यासारखं

जाळायची पद्धत असलेल्या ठिकाणी तर तेवढीही गरज नाही! बोटभर जागेचीही गरज नाही. हेच मूलतत्त्व!'

मिळेल तिथे जमिनी लुटायचा वसा घेतलेल्या, मग ती मुंबईतली असो की कोकणातली, राजकारण्यांपासून धनदांडग्यापर्यंत सर्वांना एकाच वेळी अंजन भैरप्पा घालतात.

खूप मूलभूत प्रश्न उपस्थित करत, मूलभूत विचारांना हात घालत भैरप्पांनी दोन अचूक निरीक्षण स्पष्टपणे मांडली आहेत त्यांचा इथेच काय, कुठेही उल्लेख करत राहायलाच हवं.

'....मागासलेले आहेत, म्हणून अल्प गुण मिळालेल्यांना एकीकडे तुम्ही प्रवेश देत आहात. मग गुणवत्ता असलेल्यांनी पैसे देऊन सीट विकत घेतली, तर त्यात काय चुकलं?...'

आणि – काशीसारख्या गावात असला उद्योगधंदा (डिझेल रेल्वेचा कारखाना) सुरू करणं अगदी चुकीचं आहे. अशा गावात एखादं विद्यापीठ किंवा कॉलेज स्थापायला पाहिजे. मदनमोहन मालवीय, संपूर्णानंदजी यांना हे समजत होतं. त्रिपाठीजींना एवढं तारतम्य राहिलं नाही...

...हे असं वाचूनच कोणी एखादा नेता निर्माण व्हायची शक्यता आहे. ज्यावेळी समाजव्यवस्था खोल गर्तेत जाते तेव्हा लेखकानीच नवव्यवस्थेचे, क्रांतीचे विचार देऊन तिला बाहेर काढलं आहे. कोणी स्वयंभू नेत्याच्या डोक्यात ते विचार घालून. अशी ताकद भैरप्पांच्या 'तंतू' मध्ये आहे.

तंतू, पृष्ठे ८५०, चारशेपन्नास रुपये

पालकांसाठी खुषखबर!

*खास मुलांसाठी आम्ही **एक आकर्षक सवलत योजना** जाहीर करीत आहोत. आपण मे महिन्यापासून १० महिने दरमहा २० रु. पाठवा. आपल्या मुलांसाठी पुढील मे महिन्यात ३०० रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके आम्ही आमच्या खर्चाने पाठवू. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व मुलांसाठी मे महिन्यात छान छान भरपूर पुस्तके घरपोच मिळवा.*

*आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत**, १२१६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.*

तेरा वर्षाच्या मुलीने
बॉंबहल्ल्यांच्या वर्षावात
सुन्नपणे घालवलेले दिवस

इलाटाज् डायरी

अनु.: ज्ञानदा नाईक

'डायरी ऑफ अने फ्रँक'ने जगभरच्या वाचकवर्गाला युद्धकाळातील कुमार मनाच्या आंदोलनांची झळ हृदयस्पर्शी झलक दाखवली. अनेक व्यक्तींना त्या डायरीने अस्वस्थ केले. त्याच स्वरूपाची ही इलाटाची डायरी आहे.

ही इलाटा आहे सारायेव्होची. सर्बियाची. युगोस्लाव्हियात यादवी युद्ध सुरु झाले. सर्बिया, बोस्निया वगैरे राज्यात वांशिक वर्चस्वासाठी संघर्ष सुरु झाले. त्याची झळ अर्थातच सर्व नागरिकांना पोचली. तोफातून बॉंबगोळ्यांचा वर्षाव वेळीअवेळी होऊ लागला. नागरिकांनी तळघरांचा आश्रय घेतला. शाळा बंद झाल्या. पॉप संगीत, चित्रपट, हिकालीन आरोग्यधामातील बर्फावरून घसरण्याचे खेळ, सारे बंद. तळघरात कोंडून घेऊन राहण्याची वेळ आल्यावर वीजप्रवाह नाही, पाणीपुरवठा विस्कळित, फोन नादुरुस्त, रेशनवरचे ठराविक धान्य व पाव खाऊन राहण्याची प्रत्येकावर आलेली पाळी, काळ्या बाजारात महाग मिळणारे डबाबंद खाद्यपदार्थ अशा एकूण परिस्थितीत कोणाचीही घुसमट होणार. इलाटाने त्याच घुसमटीला आपल्या दैनंदिनीत शब्दरूप दिले. आपल्या मनातले वादळवारे टिपले. अनेक मित्रमैत्रिणी बॉंबहल्ल्यात दगावले. त्यामुळे तिला एकटे एकटे वाटते. सारे सहन करण्याच्या पलीकडचे आहे असेही वाटते. हुंदके दाटून येतात. इलाटा ही सधन, सुस्थिर घरातली मुलगी. तशात एकुलती एक. वडील मलिक कायदेपंडित, आई अलीसा औषध विक्रेती. १९९३ मध्ये तिच्या दैनंदिनीतील काही नोंदीच्या आधारे पत्रकार जेनि डी गिवात्री याने संडे टाइम्समध्ये मुलाखतवजा लेख लिहिला. त्यामुळे तिला अनेक देशांतून पत्रे आली. २३ डिसेंबर १९९३ रोजी आपल्या आईवडलांसह इलाटाने सारायेव्होतील त्या तळघरातून फ्रेंच मदत केंद्राच्या मदतीने सुटका करून घेतली व संयुक्त राष्ट्रसंघाच्या विमानातून पॅरिस गाठले. सध्या ती फ्रान्समध्ये आहे.

डायरीचा आरंभ हातो २ सप्टेंबर १९९१ रोजी. शाळेचे नवे वर्ष सुरू होणार आहे. इलाटा पाचवीत बसणार आहे. आरंभीचा भाग शाळा – मैत्रिणी यांच्यातच रेंगाळतो. ऑक्टोबरमध्ये स्लोव्होनिया व क्रोएशिया यांच्यात लष्करी संघर्ष सुरू होतो. वडील राखीव दलात जाण्यासाठी तयार होतात. ३ डिसेंबर हा तिचा वाढदिवस; सर्दीपडशाच्या आजारामुळे घरीच जातो. आवडती बाहुली बिंबिलिबिका, मांजर सिसी, पाळीव पक्षी किको, ख्रिसमसच्या रेळची धावपळ, दंगलींचे पसरत जाणारे लोण, असे करता २ मे हा दिवस उजाडतो. सारायेव्हातील हा सर्वात वाईट दिवस. दुपारी गोळीबार सुरू होतो. तळघरात सर्वांना राह्यला जावे लागते. त्यात घुशींचा वावर असतो. फ्लॅटच्या खिडक्यांच्या काचा फुटतात. आजूबाजूची काही घरे आगीत जळून खाक. एका वर्षाने त्या दिवसाबद्दल ती पुन्हा डायरीत लिहिते, "आमच्या आयुष्यातील सर्वात दुर्दैवी दिवशी – वाईट दिवसांच्या मालिकेतील पहिला दिवस – दुर्गंधी येणारे तळघर, उपासमार, फुटणाऱ्या काचा, भयानक वास, अन्नपाण्याचा अभाव – चिंता, भीती. पुढे काय होणार या विचारानेच भरणारी हुडहुडी – वर्ष गेले. पण मी अजून जिवंत आहे. धडधाकट आहे.. हे असं किती दिवस चालणार?"

रविवार १७ ऑक्टोबर १९९३ ची पत्ररूप नोंद ही सर्वात शेवटची आहे. तिच्यात इलाटा लिहिते : "हे परमेश्वरा, ते साऱ्याचाच का नाश करीत आहेत? हा गोळीबार कधीच थांबणार नाही का? त्या दुष्ट लोकांना मुलांचा, सामान्य लोकांचा खरोखर इतका तिटकारा आहे का?.. या नरकपुरीत आपण एकटे आहोत. कोणीही मदतीसाठी येथे येत नाही.. नीच लोक आम्हांला नष्ट करू पाहताहेत. का? कशासाठी? आम्ही काय पाप केलंय? आम्ही निष्पाप आहोत. पण आम्ही काही करू शकत नाही. असहाय आहोत."

एका स्वच्छंदी हसऱ्या खेळकर मुलीच्या मनावर युद्धाचे जे पडसाद उमटतात, त्याचे भयानकपण या छोट्या छोट्या नोंदीतून आपल्यापुढे येते आणि आपल्या संवेदनाशीलतेवर एकेक ओरखडा उमटवत जाते. या कठिण अवस्थेचा धीरोदात्तपणे सामना करण्यातील जिद्दही मनावर ठसते.

–शंकर सारडा

इलाटाज् डायरी, पृष्ठे १३२, ऐंशी रुपये

विविध विषयांवरील उत्तम मराठी पुस्तकांसाठी अवश्य भेट द्या.

आयडियल पुस्तक त्रिवेणी

छबिलदास रोड, दादर (पश्चिम), मुंबई - २८. फोन - ४३०२१२६

नितळ प्रामाणिक
आत्मकथनाचा उत्तम अनुवाद

मी, फूलनदेवी

अनु.: डॉ. प्रमोद जोगळेकर

हे फूलनदेवीचे आत्मकथन आहे. वर्णनामधील नितळपणा, साधी ओघवती भाषा व विलक्षण चीड मनात ठेऊन जगणारी फूलनदेवी – या सर्व वैशिष्ट्यांमुळे हे पुस्तक वाचकाला झपाटून टाकते.

मारी तेरेज ल्यूनी व पॉल रोंबाली हे मूळ शब्दांकनकर्ते. मुळात चरित्र आत्मचरित्र हा अवघड प्रकार. त्यातून फूलनसारख्या अक्षरशत्रू बाईचं आत्मकथन शब्दांकित करणं म्हणजे आव्हानच. अत्याचाराची शिकार होणाऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडणारी, अत्याचारी लोकांना शासन करू पाहणारी फूलन आणि स्वतः असंख्य अत्याचारांचा बळी ठरलेली तरीही जिद्दीने जगत राहणारी फूलनदेवी असे तिच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पदर आहेत. या आत्मकथनातून ते आपोआप व प्रभावीपणे वाचकांसाठी उलगडत जातात. सर्वसाधारण मध्यमवर्गीय वाचकाच्या दृष्टीने फूलनदेवी म्हणजे डाकू ही जी प्रतिमा मनात असते त्या प्रतिमेला हे आत्मकथन वाचल्यावर तडा जातो.

माणूस असण्याचा हक्क फूलनदेवी मागत आहे. आपल्याला शांतपणे जगायचे आहे असे ती सांगते. देवीला मानणारे आस्तिक मन, स्त्रीत्वाचा अर्थ शोधू पाहणारं मन हे सर्व हे आत्मकथन वाचल्यावर जाणवत राहते. या पुस्तकात शेवटी दिलेले नकाशे व मध्ये दिलेली छायाचित्रे यामुळे पुस्तक वेधक झाले आहे. आपल्याला मादीसारखे वागवणाऱ्यांचा सूड घेणारी फूलनदेवी स्वभावातल्या अनेक बारकाव्यांमुळे, व्यक्तिमत्त्वाला असणाऱ्या विविध पदरांमुळे चांगलीच लक्षात राहते.

–प्रा. मोहन पाठक

वेदनेचं अनाम नातं
उलगडणाऱ्या स्त्रियांच्या कथा

परिचय

अनु.: माधवी देसाई

'कहानियोंके आंगनमें' या नावाच्या अमृता प्रीतम यांच्या कथासंग्रहाचा माधवी देसाईंनी अनुवाद केला आहे. 'परिचय' नावाने असलेला हा चौदा कथांचा संग्रह.

प्रत्येक कथेच्या आरंभी पूर्वीच्या काही काळात ती व्यक्ती मला भेटली वा एक अशी घटना माझ्यासमोर होती ज्यामुळे त्या कथेच्या रूपाने तो प्रसंग वा ती व्यक्ती आपल्यासमोर उलगडत गेली, असे निवेदन अमृताजी करतात. यातूनच पूजा, मूर्ती, चारू, गुलबत्ती, रखी अशा नायिका किंवा बक्षी, 'स', इंद्र असे नायक वाचकासमोर साकारतात. दिल्ली, मध्यप्रदेश, नेपाळ, पंजाब अशा वेगवेगळ्या प्रांतातली पार्श्वभूमी लाभलेल्या या कथा वेगळ्या रुढी, वेगळ्या परंपरा, वेगळा निसर्ग यांच्या कुशीत फुलत जातात. प्रत्येक कथेच्या आरंभी 'ती मुलगी', 'प्रतीक आणि सावल्या' अशा शीर्षकान्तर्गत ती व्यक्ती कुठे, कशी भेटली याचा खुलासा असून त्यामुळे 'आपआपलं कर्ज', 'घूंघट उचलला' अशा नावाने मूळ कथा सुरू होते.

अमृता प्रीतम यांच्या मधाळ, उत्फुल्ल भाषेचा गोडवा माधवी देसाईंनी आपल्या कथेत सुंदर उतरवला आहे. ''जीवनाचा प्रवास करणाऱ्या अनेक व्यक्तींच्या अंतरंगात एक वेदनेचा सल सतत त्यांच्यासोबत वाटचाल करीत असतो. त्या वेदनेचं आणि त्यांचं एक अनाम असं नातंच जडून गेलेलं असतं. कधी कधी त्यांना वाटतं की, जीवनाच्या त्या प्रवासात त्यांना कधीतरी, कुठेतरी असं एक अंगण भेटावं ज्या अंगणात त्या वेदनेपासून काही काळ तरी बाजूला होऊन त्यांना एक मनमोकळा श्वास घेता येईल.''

–शोभा नाखरे

एका जर्मन कुटुंबाची
युद्धकाळातील घुसमट

डायरी ऑफ ॲन फ्रँक

अनु.: मंगला निगुडकर

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ज्यू लोकांचा जर्मनीमध्ये अत्यंत छळ झाला. या अत्याचारांपासून सुटका व्हावी म्हणून अनेक ज्यू कुटुंबांनी जर्मनीतून पळ काढला. फ्रँकफुर्ट येथील एक ज्यू कुटुंब १९३३ साली हॉलंडमध्ये स्थलांतर करते. ॲन ही त्यावेळी ४ वर्षांची असते. तिची मोठी बहीण मारगॉट. वडील डच ऑपेरा कंपनीचे संचालक. आई एडिथ हॉलंडर फ्रँक. जर्मनांनी हॉलंड काबीज करून ज्यूंच्यावर बंधने लादली. फ्रँक हे सुरक्षिततेसाठी अज्ञातवासात जाण्याचे ठरवितात. ५ जुलै १९४२ रोजी ते आपल्या स्वतःच्या ऑफिसच्या इमारतीमधल्या एका भागात राहण्याची व्यवस्था करतात. कोणालाही संशय येणार नाही अशी त्या चोर दरवाजाच्या आतील खोल्यांची रचना असते. दिवाणखाना, झोपण्याची व अभ्यासाची खोली, बाथरूम, मुलींसाठी खोल्या, इ. या फ्रँक कुटुंबाबरोबरच द व्हॅन पेल्स हे दुसरे कुटुंबही तेथे राहणार असते.

तेरा वर्षांची ॲन या वास्तव्यात रोजनिशी लिहिण्यास आरंभ करते. तिला कोणीही मैत्रीण नाही, म्हणून ती रोजनिशीला मैत्रीण समजून किटी असे नाव देते. या कुटुंबाचा शोध घेण्यासाठी जर्मन गुप्तहेर गेस्टापो घरोघर झडत्या घेतात. दोन कुटुंबे एकत्र. त्यात वादविवाद, भांडणे, मतभेद, रुसवे फुगवे हेही प्रकार अटळ. एका कोंडीत सापडल्यावर माणसेही कधी समंजसपणे तर कधी हिंस्त्रपणे वागतात याचे अनेक अनुभव या रोजनिशीत येतात.

ॲनने १२ जून ४२ ते १ ऑगस्ट ४४ पर्यंत ही रोजनिशी लिहिली. नंतर त्या गुप्त जागेचा पत्ता लागल्याने तिला व तिच्या सर्व नातलगांना पकडण्यात येते. त्यांना ठार मारण्यात येते. फक्त तिचे वडील वाचतात. ते ॲन फ्रँकच्या इच्छेनुसार ही डायरी प्रसिद्ध करतात. (१९४७) ती जगभरच्या वाचकांना चटका लावते. लाखोंनी खपते. मराठी वाचकांनीही ही डायरी नक्कीच अस्वस्थ करील.

–शंकर सारडा

स्त्री - संवेदनांची
परावर्तित रूपे

लोलक

शैलजा डोंगरे

'लोलक' हा कथासंग्रह स्त्रीमनाच्या विविध संवेदना परावर्तित करतो. काचेला तास पाडून, लोलक तयार होते. या लोलकातून एखाद्या वस्तूकडे वेगवेगळ्या कोनातून, वेगवगेळ्या दिशेतून पाहिले तर एकाच वस्तूच्या अनेक रंगछटा दिसतात. तसेच माणसाचे, विशेषतः स्त्रीचे जगणे पृथक दृष्टिकोनातून जाणिवेच्या लोलकातून लेखिकेने पाहिले आहे. आणि त्यांना कथेचा घाट दिला आहे.

लेखिकेच्या कथाविषयामध्ये, सामान्य माणसाचे, विशेषतः स्त्रीचे जीवन, हे एक समान आशयसूत्र आहे – त्यात संसारी जीवन आहे, प्रौढ कुमारिकांच्या भावना प्रेमभंग, विजोड जोडपी, सुखी घरे, कथी परिस्थितिजन्य विकृती, सावत्रपणा असे सर्वसामान्यांच्या जगण्यात असणारे – असू शकणारे संदर्भ आहेत. खरे तर हे विषय नेहमीचेच आहेत. पण त्या त्या परिस्थितीत प्रत्येक व्यक्तीच्या जगण्याच्या जीवनधारणा, प्रेरणा वेगळ्या आहेत.

लोलकमधील कथेत नेमकेपणा आहे. जीवनाचा एखादाच तुकडा एकेका कथेत निवडला आहे. कथा विस्कळीत, पसरट नाहीत. अनेक कथांना प्रमुख स्त्री-व्यक्तिरेखाटनाचेच शीर्षक दिले आहे.

साधीसुधी माणसेच कधी साधेपणानं, कधी वेगळेपणानं या लोलकातून परावर्तित होतात. त्यांच्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास अनेकरंगी जीवनानुभव अनुभवास येतील. शंकर पाटील कथा पुरस्कार या हा कथासंग्रहाला प्राप्त झाला आहे.

–सुवर्णा दिवेकर

ग्रामीण स्त्रीचे
दुःखमय जगणे

डव्हाळं

बा. ग. केसकर

डव्हाळं (डोहाळे) हा ग्रामीण जीवन, विशेषतः ग्रामीण स्त्रियांच्या जीवनातील समस्या, दुःखे आणि संघर्ष चितारणारा कथांचा संग्रह. लेखकाने हे वास्तव तन्मयतेने साकारले आहे. कथांमधून प्रकट होणाऱ्या परंपरा, अंधश्रद्धा, जुनी जीवनमूल्ये आणि दारिद्र्य, कष्ट आणि सासुरवास, नवऱ्याची मारहाण, यांच्याशी सामना करणाऱ्या ग्रामीण स्त्रिया, ह्यांचे परिणामकारक चित्र उभे केले आहे.

ग्रामीण आणि शहरी जीवनाच्या सीमारेषा पुसट किंवा नाहीशा झाल्या आहेत. अद्यापही ग्रामीण मुलगी 'लग्नापत्तुर' होईल तेवढंच शिकते. आणि संसारात कष्ट, माहेराकडून देण्याघेण्यावरून जाच, सासूची ताबेदारी, सणवार, दाणावैरण, पुरण-वरण यातच जीवन व्यतीत करते. कारण मनाचे पुरोगामित्व, बंड, स्त्री शक्ती, स्त्री पुरुष समानता या शहरी कल्पना, एकविसाव्या शतकानेही त्यांच्याप्रत पोहोचवल्या नाहीत.

'डव्हाळं' ही पहिलीच कथा स्त्रीजीवनाशी निगडीत मातृत्वाच्या कल्पनेशी बांधली आहे. आतीबाय, सासरा आणि नवऱ्याच्या जाचात दिवस कंठणाऱ्या 'ती'चे डोहाळे, त्यापायी तिला किती दुःख सोसावे लागते याचे चित्रण अस्वस्थ करणारे आहे.

'उखणलेलं अंगण' ही अशीच एका दुदैवी स्त्रीची कथा. 'चटणीत काच सापडल्याच्या निमित्तानं तिचं भविष्य अंधारतं'. तिच्या पुढ्यातील मुलगा वारस म्हणून काढून घेतला जातो. ती मात्र अशीच उपाशी, अव्हेरलेली, नाकारलेली. असेच स्त्री दुःख 'अपराधी'मध्ये प्रकटते. स्त्रीवर 'संशय' या कल्पनेनी कितीतरी खेडूत घरांचा विनाश ओढवतो. 'अग्निदिव्य' आणि 'राखणदार' कथा संशयामुळे छळ सोसाव्या लागलेल्या स्त्रीदु;खाच्या आहेत.

एका पुरुषाने लेखकाने स्त्रीमनाची आंदोलने इतकी हळुवार टिपली आहेत याचे कौतुक वाटते.

—सुवर्णा दिवेकर

स्वातंत्र्यासाठी झुंजणाऱ्या
'स्त्री'ची कहाणी

नॉट विदाऊट माय डॉटर

अनु.: सौ. लीना सोहोनी

'नॉट विदाऊट माय डॉटर' हे पुस्तक सौ. लीना सोहोनी यांनी इतक्या सुंदर शैलीत मराठीत अनुवादित केलंय की, वाचकाला शेवटच्या पानापर्यंत खिळवून ठेवतं. एक आई आपल्या मुलीला सोडून जगाच्या पाठीवर कुठेही राहू शकत नाही, हे कादंबरीच्या शीर्षकातून जाणवते.

स्त्रियांवरील अत्याचार अजूनही मानवतावादी लोकांना सतावीत आहेत. या कादंबरीतील घटना काळातल्या नसून, १९८४ ते ८६ या दरम्यानच्या १८ महिन्यांत घडलेल्या आहेत; पण त्या वाचताना अंगावर शहारे येतात. स्वातंत्र्यासाठी आणि मूलभूत हक्कासाठी एका स्त्रीला आपल्या चार वर्षाच्या लेकीसह किती यातना भोगाव्या लागतात याचे जिवंत चित्रण लेखिकेने केले आहे. ही कथा परकीय स्त्री'ची आहे असे न वाटता फक्त 'पुरुषी अहंकाराला' बळी पडलेल्या एका अबलेची वाटते. तिच्यावर अन्याय करणाऱ्या तमाम व्यक्तींची, संस्कृतीची चीड येते. कादंबरीतील प्रत्येक पात्राचं व्यक्तिचित्रण नेटक्या शब्दात, पण यथार्थतेने करण्यात ती यशस्वी झाली आहे.

वातावरणनिर्मिती हाही या कादंबरीतला उल्लेखनीय मुद्दा आहे. कौटुंबिक, भावनिक, राजनैतिक आणि भौगोलिक वातावरणाची निर्मिती लेखिका जितकी परिणामकारक करते, तितकीच ती धार्मिक किंवा आध्यात्मिक वातावरणाचाही परिणाम दाखवून जाते.

ही कादंबरी खरोखरच वाचनीय आहे. काल्पनिक कथांपेक्षा वास्तवात अनुभवलेले हे थरारक चित्र हृदयाला स्पर्शून जाते.

–ज्योती बागुल

जगज्जेत्या
उद्बोधक कहाणी

स्टेफी

अनु.: आशा कर्दळे

स्टेफी ग्राफ ही महिलांच्या टेनिसमधली जगातली सर्वश्रेष्ठ तारका आहे, तिच्या सध्याच्या कोणत्याही प्रतिस्पर्ध्यांपेक्षा तिने सर्वात जास्त मानाच्या स्पर्धा जिंकल्या आहेत. नव्या टेनिस खेळाडूंची ती आदर्श आहे.

तिच्या यशाचा आलेख दाखवणारं 'स्टेफी' हे तिचं चरित्र आता मराठीत आलं आहे. स्टेफीच्या कारकीर्दीची सुरुवात ते आताचा तिचा उत्कर्ष, या काळात तिला आलेल्या अडचणी, तिचा प्रचंड चाहतावर्ग, त्यांच्यापैकीच एकाने तिच्यावरच्या अतीव प्रेमापायी मोनिका सेलेसवर केलेला हल्ला, स्टेफीची वाढती लोकप्रियता, तिचा उत्कर्ष, वडिलांवरचे आरोप, त्यांचा तुरुंगवास या काळात तिला जाणवणारा तणाव त्यावर मात करून तिने बहरवलेली कारकीर्द या गोष्टी यात आहेत.

जिंकलेल्या किंवा हरलेल्या अनेक सामन्यांची उत्कंठावर्धक वर्णनं यात आहेत. ज्यांनी स्टेफी, मोनिका, सांचेझ यांना खेळताना पाहिलंय, त्यांच्या डोळ्यासमोर हे सामने चटकन उभे राहतात.

स्टेफीचे चाहते जेवढे आहेत, तेवढेच तिचे निंदकही. स्टेफीबद्दल अनेक गैरसमज आहेत. या चरित्राने प्रथमच तिच्या जाहीर प्रतिमेच्या पलीकडे जाऊन तिचा खरा चेहरा पुढे आणला आहे.

टेनिसमध्ये सर्वोच्च स्थान सर्वाधिक काळ टिकविण्याचा विक्रम करणाऱ्या या महान खेळाडूची ही कहाणी टेनिसच्या रसिकांना मनोरंजक तसेच माहितीपूर्ण वाटेल अशी आहे.

हेलन केलरची
जीवनगाथा

आंधळी

अनु.: शान्ता ज. शेळके

जगातील सर्व अंध अपंगांसाठी जिने आपले जीवन समर्पित केले त्या हेलन केलरचे जीवनचरित्र समजून घ्यायचे असेल तर 'आंधळी' हे पुस्तक वाचलेच पाहिजे. व्यक्तीच्या अंगी दुर्दम्य आशावाद असतो त्या व्यक्ती जीवनातल्या अनेक खडतर प्रसंगांना सामोरे जाऊन आपलं असामान्यत्व सिद्ध करतात. त्यापैकी हेलन केलर ही एक होय. २७ जून १८८० रोजी जन्मलेली हेलन केलर एका जीवघेण्यात दुखण्यात आपली तीन ज्ञानेंद्रिये गमावते आणि एका बुद्धिमान मुलीचे जग काळोखात व्यापले जाते. पण ही आंधळी मुलगी डोळसपणे आपल्या भविष्याचा विचार करते. तिचे आईवडील, मिस फुलर, ॲन सॅलिव्हन या तिच्या शिक्षिका यांच्या सहाय्याने तिने शब्दांचा शोध घेतला. आपल्या स्पर्शातून तिने अनेक गोष्टी शिकून घेतल्या. तिच्या स्पर्शसंवेदना फार तीव्र होत्या. नुसत्या हवेच्या वासावरून ती वादळ होणार आहे हे सांगत असे. आपण स्वतःच्या अपेक्षा वाढवल्या की, त्या पुऱ्या करण्याची वृत्ती आपोआप आपल्यात निर्माण होते ही खूणगाठ तिने आपल्या मनाशी बांधली होती. पराभव हा शब्द तिला माहीत नव्हता. पदवी घेताना आपल्या भाषणात ती म्हणते, "अंतःकरणात जेव्हा उंच भरारण्याची महत्त्वाकांक्षा असते तेव्हा भुईवर सरपटणे कुणालाच मानवत नाही. काळोख आणि निःशब्दता ही आत्म्याच्या प्रगतीच्या आड येत नसते."

अशी चरित्रे ही स्फूर्तिदायी असतात. अंधांचे जीवन कळले म्हणजे डोळसांनाही जीवन जगताना वेगळी प्रेरणा मिळते. एकूणच 'आंधळी' हे पुस्तक वाचनीय आहे.

–ज्योत्स्ना आफळे

नवी स्पर्धा

पुस्तकाची नावे सांगा, बक्षीस मिळवा

या अंकात दिलेल्या पुस्तक परिचयातील काही वाक्ये येथे देत आहोत. ती वाक्ये कुठल्या पुस्तकाच्या संदर्भात आली आहेत ते कळवायचे. बरोबर कळविणाऱ्या स्पर्धकांपैकी लॉट टाकून तिघांना प्रत्येकी १०० रु.ची पुस्तके बक्षीसादाखल देण्यात येतील.

१) आपल्याला न आवडणारा, न झेपणारा, न जमणारा अभ्यासक्रम घरच्या व वडीलधाऱ्यांच्या आग्रहाखातर निवडून नंतर पस्तावत बसणे इष्ट नाही.
पुस्तक : _____

२) फाळणीची पार्श्वभूमी या कादंबरीला आहे.
पुस्तक : _____

३) आम्ही निष्पाप आहोत. पण आम्ही काही करू शकत नाही. असहाय्य आहोत.
पुस्तक : _____

उत्तर पाठवण्याची मुदत - २० जुलै १९९८

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,**
मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणे - ४११०३०.

शाळा, महाविद्यालयं, ग्रंथालयं आणि साहित्यप्रेमींना खूषखबर
अनेक विषयांवरील मराठी पुस्तकं मनमोकळ्या वातावरणात
तासन् तास मनसोक्त पाहण्यासाठी आणि खरेदी करण्यासाठी
कोल्हापूरमधील एकमेव ठिकाण
मेहता बुक सेलर्स
३२२, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर ४१६०१२.
फोन : ५२२३०४ टेलिफॅक्स : ५२१८८१

फुले आणि काटे

व्यक्तिपरीक्षणातील उथळपणा

मराठीत व्यक्तिपरीक्षणात्मक लेखन हे बहुतांशी शिष्टाचाराच्या, प्रासंगिकतेच्या औचित्याच्या मर्यादा मान्य करूनच होत आले आहे. फार खोलात जाऊन कुठल्याहा व्यक्तीची किंवा नात्याची चिकित्सा करायची असेल तर कथा-कादंबऱ्यांचा आश्रय घेण्याचा सावधपणा सोयीस्कर ठरतो. जयवंत दळवी यांची जीएंच्या मृत्यूंनंतर लगेच निघालेल्या ललितच्या विशेषांकात जीएंचा तथाकथित भोंदूपणा उघड करणारे प्रसंग दिले. त्या लेखाच्या त्यावेळच्या औचित्याबद्दल अजूनही चर्चा होते. एक एक मर्यादा मोठीच आहे त्याचमुळे आपल्या अनेक साहित्यिकांची आत्मचिरित्रे ही एकांगी, अर्धवट किंवा काही प्रमाणात खोटीही वाटतात. आचार्य अत्रे अनेक खंडांचे आत्मचरित्र लिहितात; परंतु वनमालाबाईंवर लिहायचे टाळतात. ना. सी. फडके आपल्या आयुष्याला कादंबरी म्हणतात. परंतु प्रथम संसाराबद्दल फारसे लिहित नाहीत. एक कलावंत लेखक म्हणून या दोघांनीही प्रथम पत्नीचे व आपले भावनिक नाते ताणले, दुरावले जाण्याचे कारण आणि नव्या व्यक्तीमुळे आपल्या लेखन प्रक्रियेवर आणि भावजीवनावर पडलेला प्रभाव या अंगाने प्रकाश टाकला असता तर सर्जनशील कलावंत म्हणून त्या निवेदनामुळे आपल्या मराठी माणसाच्या स्त्री-पुरुष संबंधाबद्दलच्या मूलभूत आकलनातही कदाचित फरक पडला असता. कलावंताची मानसिकता पटवून घेण्याला अनुकूल वातावरण निर्माण झाले असते. कारण अशा कलावंतांना समाजात एक विशिष्ट स्थान असते. त्यांच्या आंतरिक संघर्षातून अशा काहीशा अ-सांकेतिक नात्यांचा अर्थ लावणे वा त्यांचे नेमके स्वरूप जाणून घेणे समाजाला सुकर होऊ शकते. जयंती-पुण्यतिथीच्या निमित्ताने आपल्याकडे वृत्तपत्रात छापले जाणारे लेखन हे बऱ्याच प्रमाणात वरवरचे असते. व्यक्तिपरीक्षण करण्याची आपली क्षमताच त्यामुळे बोथट होत गेली आहे.

-शंकर सारडा (जिगसॉच्या परीक्षणात, अंतर्नाद, मे १९९८)

विनोदी साहित्यातील स्त्रीप्रतिमा

अलीकडील विनोदी साहित्यातून वात्रटिका, चावटिका, द्व्यर्थी शब्दयोजना करून केलेल्या कविता, कोट्या यांची रेलचेल असल्याचे दिसते. त्यातून बऱ्याचदा स्त्रीशरीराचे अश्लील वर्णन येते असे हिणकस लेखन करणाऱ्यांना स्त्री ही कधी दुधाळ म्हशीसारखी वाटते तर कधी ते स्वयंपाकघरातील कुकर साहित्य आणून त्याची शिट्टी वाजविण्यास कमी करीत नाहीत. स्त्रीच्या लठ्ठपणाची वर्णने करणे, कधी तिला जळत्या सिगरेटची उपमा देऊन तिचे कश मारावेसे वाटतात असे म्हणणे - हे स्त्री प्रतिमा डागाळण्यास कारण ठरणारे लेखन विनोदाची प्रतिष्ठाही घालवते.

-प्रा. मुमताजखान देशपांडे (दै. अजिंठा, ६-१२-१९९७)

एप्रिल अंकातील स्पर्धांचे निकाल

-: पहिली स्पर्धा :-

एप्रिल १९९८च्या अंकात विज्ञानकथाकार आणि त्यांची पुस्तके यांच्या जोड्या जुळवण्याची स्पर्धा जाहीर केली होती. त्या स्पर्धेचे उत्तर पुढे देत आहोत.

१)	**डॉ. जयंत नारळीकर**	*व्हायरस*
२)	**निरंजन घाटे**	*मृत्युपत्र, यंत्रलेखक*
३)	**सुबोध जावडेकर**	*संगणकाची सावली, वामनाचे चौथे पाऊल*
४)	**डॉ. बाळ फोंडके**	*अखेरचा प्रयोग*
५)	**भा. रा. भागवत**	*चंद्रावर स्वारी*
६)	**लक्ष्मण लोंढे**	*दुसरा आइनस्टाइन*

बरोबर उत्तरे पाठवणाऱ्या स्पर्धकांपैकी लॉट टाकून भाग्यवंत ठरलेले स्पर्धक पुढीलप्रमाणे :

१) **ए. एस. नागरगोजे,** क्रांतीनगर, पाटोदा ४१४२०४, जि. बीड.
२) **व्यंकटेश ना. माणेकरी,** २०५/२४ तेलंगी पाच्छापेठ, सोलापूर ४१३००५.
३) **दीपक देवळेकर,** ४२७ गणेशनगर, राजापूर ४१६७०२, जि. रत्नागिरी.
४) **निकिता शंकरराव शेवाळे,** पो. पेरेजपूर ४२४३०४, ता. साक्री, जि. धुळे.
५) **वैशाली दि. कंठे,** जकात नाका नं. २ मागे, दर्यापूर ४४४८०३, जि. अमरावती.

अ	नु	भ	व		क	लि	का
रु			न				च
णा			दे	ख	णे		वे
	लो		व				ल
फ्रँ	क		ता	न	से	न	
	ना			वा			म
	य		आ	का	श		रा
ए	क	टी		ळ			ठा

शब्दकोडे क्र. २

या स्पर्धेत पुढील भाग्यवंत उमेदवीर बक्षीसपात्र ठरले आहेत त्यांनी प्रत्येकी शंभर रुपयांची पुस्तके कळवावी.

१) **दत्ता शेंडगे,** नरसोबावाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
२) **के. एम. लखनसिंह,** पो. अर्जुनी (मोरगाव) ४४१७०१, जि. भंडारा.
३) **मधुकर वासुदेव सहस्रबुद्धे,** ४७/५४ एरंडवन, पौड रोड, पुणे ४११०३८.

ग्रंथजगत शब्दकोडे सोडवा, बक्षीस मिळवा!



ग्रंथजगत शब्दकोडे : ५

रचनाकार : श्री विजय

वरील चौकानात बरोबर उत्तरे भरून दि. **२० जुलै १९९८** पर्यंत पाठवा. बरोबर उत्तरे पाठवणाऱ्यांपैकी (लॉट टाकून येणाऱ्या) पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी १०० रु.ची पुस्तके बक्षीस.

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव, पुणे–४११०३०.

आडवे शब्द :

१. निकामी वस्तू, मोडीत काढलेले लोखंडी व इतर सामान, ३. सरळ मनाचा प्रामाणिक, ६. लहान काकडी, ८. मिठी, ९. भस्मसात, राख झालेले, १०. यात्रेची जागा, पवित्र स्थान, १२. सरावाने निष्णात झालेला, १५. एक उसळीची भाजी, १७. नाशवंत, १८. डोक्यावर केस अजिबात न उगवणारा, २०. धूळ, आर्तव, २३. चंद्र, २५. अनुमतीदर्शक पास/लायसेन्स, २७. एक पूजनीय वृक्ष, २९. ताळा, उन्मत्तपणा, ३०. व्रत, ३२. राक्षस, ३४. एक जमात ३६. फांदी, ३७. –– दाटे चोहीकडे, ३८. मातृभूमी.

उभे शब्द :

१. फालतू/निरर्थक बडबड, २. खेड्यात तयार झालेले, ग्रामीण, ३. पोपट, ४. बुद्धी, ५. पवित्र जल, ६. फाजील, व्रात्य, ७. गोष्ट, ९. खात्री, ११. कल्याण, हित, १३. देव, १४. कणखर व कष्टाळू, १६. डुक्कर, १९. लाकूड कापण्याचे हत्यार, २१. अंतःपुर, २२. खिडकीची काच, २४. निद्रा, २६. मस्ती, २८. एक हजार किलोग्रॅम, ३१. तात्पुरता बांधलेला लाकडी पूल, ३३. –– मराठीत नोटबुक, ३४. भूत––, वर्तमान––, ३५. पद्धत, रुढी.

वाचकांचा प्रतिसाद

मराठी ग्रंथजगतमध्ये दुर्मिळ मराठी लेखक, त्यांचे साहित्य त्याची सद्यःस्थिती इत्यादीची ही माहिती द्यावी. तसेच सर्वाधिक खपाची पुस्तके व दरवर्षी विविध पुरस्कार मिळणाऱ्या पुस्तकांची यादीही द्यावी.

– रमेश दत्तात्रय सांगळे, नाशिकरोड

मागच्या पिढीतील आदरणीय लेखक श्री. भाऊसाहेब खांडेकर यांच्यावर चिखलफेक करणाऱ्या व्यक्तीची तुम्ही आपल्या संपादकीयात खरमरीत शब्दात जी कानउघाडणी केली तो योग्यच आहे. संपादकीय कर्तव्यास तुम्ही जागलात या बद्दल अभिनंदन. नामवंत ग्रामीण कथाकार व कादंबरीकार आनंद यादव यांच्या साहित्यावर प्रकाश पाडणारे लेखांचे संकलन तुम्ही प्रकाशित केल्यामुळे अंकाची वाचनीयता नक्कीच वाढली आहे. श्री. यादवांच्या चौफेर लिखाणाची उत्तम कल्पना या लेखावरून मिळाल्यामुळे वाचकांना त्यांचे साहित्य वाचण्याची ओढ निर्माण होईल यात शंका नाही.

– राम गोसावी, मिरज

एप्रिल ९८चा अंक फार आवडला. आठ पुस्तकांचा मार्मिक व थोडक्यात परिचय करून दिला आहे. वाचक ती पुस्तके वाचतीलच. इतकेच नव्हे तर खरेदी करून वाचतील इतकी ती चांगली आहेत. भाषेच्या अडचणीमुळे ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त पुस्तके वाचता येत नाहीत. अशा पुस्तकांचे मराठी भाषेत अनुवादित व्हावेत. (अद्यापपर्यंत न झालेल्या पुस्तकांचे). ही विनंती.

– संध्या साळे, सिंधुदुर्ग

वाचकांना आवाहन

मेहता मराठी ग्रंथजगतचे अंक फक्त सभासदांनाच पाठविले जातील. तरी वर्गणीदारांनी व इच्छुक वाचकांनी नवीन वर्षाची वर्गणी (५० रुपये व भेट पुस्तकाचे पोस्टेज १५ रुपये) मनीऑर्डरद्वारा त्वरित पाठवावी.

एक आकर्षक योजना

ग्रंथजगतची वर्गणी रु. ५० व पोस्टेजचे रु. १५ पाठवा.
आणि १२० रुपये किंमतीचे पुस्तक भेट मिळवा.

ऑर्डर फॉर्म

ही योजना फक्त जून अखेरपर्यंतच आहे.

मा. संपादक
मेहता मराठी ग्रंथजगत
१२१६, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.

स. न. वि. वि.

होय. मला 'ग्रंथजगत'चे वार्षिक वर्गणीदार (जानेवारी - डिसेंबर १९९८) व्हायचे आहे. सोबत ५० रु. डिमांड ड्राफ्टने पाठवत आहे / मनीऑर्डरने पाठवत आहे.

'देशोदेशींच्या पाककला' हे १२० रु. किंमतीचे पुस्तक मला आपण भेट म्हणून पाठवावे, ही विनंती.

तारीख आपला

माझे नाव _____

पत्ता _____

_____ फोन _____

गाव/शहर _____ पिनकोड नंबर

माझ्या पुढील मित्रांनाही हे मासिक वर्षभर भेट म्हणून माझ्यातर्फे पाठवावे. त्यांचीही वर्गणीही सोबत जोडत आहे.

१) नाव _____
पत्ता _____
_____ फोन _____
गाव/शहर _____ पिनकोड नं. _____

२) नाव _____
पत्ता _____
_____ फोन _____
गाव/शहर _____ पिनकोड नं. _____

जून १९९८

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ वर्ष दुसरे
◆ अंक सहावा

अनुक्रम

संपादकीय ---------- २
माझी भूमिका ---------- ४
लज्जा - एक समृद्ध अनुभव ---------- ६
साहित्यवार्ता ---------- ८
मुलाखत - कमलाबाई ओगले ---------- १२
पुस्तकपरिचय ---------- १५
नवीन स्पर्धा ---------- ४३
फुले आणि काटे ---------- ४४
स्पर्धा, निकाल ---------- ४५
शब्दकोडे ---------- ४६
वाचकांचा प्रतिसाद ---------- ४७
एक आकर्षक ऑफर ---------- ४८

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
फोन : ४७६९२४

❑ कार्यकारी संपादक शंकर सारडा
❑ संपादन सहाय्य सुनीता दांडेकर
❑ मांडणी मेहता पब्लिशिंग हाऊस

❑ अंकाची किंमत ५ रु. वार्षिक वर्गणी ५० रु.
❑ वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
❑ दरमहा १५ तारखेस हे मासिक प्रसिद्ध होईल.

संपादक-मुद्रक-प्रकाशक : **सुनील मेहता,** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव, पुणे - ३०.
अक्षरजुळणी : **मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव, पुणे - ३०.

या अंकातील लेखकांची मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

स्त्री लेखिकांची वाचनीय पुस्तके

मालनगाथा	इंदिरा संत
मृद्‌गंध	इंदिरा संत
नाथ हा माझा	कांचन घाणेकर
डायरी ऑफ ॲन फ्रॅन्क	अनु.: मंगला निगुडकर
चीपर बाय द डझन	अनु.: मंगला निगुडकर
पराजिता	मंगला निगुडकर
मंजिरी	माधवी देसाई
कथा सावलीची	माधवी देसाई
परिचय	अनु.: माधवी देसाई
धुमारे	माधवी देसाई
मध्यस्थ	अनु.: लीना सोहोनी
लज्जा	अनु.: लीना सोहोनी
नॉट विदाऊट माय डॉटर	अनु.: लीना सोहोनी
माझ्या आयुष्यातील स्त्रिया आणि पुरुष	अनु.: लीना सोहोनी
निर्बाचित कलाम	अनु.: मृणालिनी गडकरी
बीज	अनु.: शैला सायनाकर
वाट दीर्घ मौनाची	अनु.: सानिया
सागरतीरी	अनु.: अंजनी नरवणे
माझं लंडन	मीना प्रभु
व्यथित मनानं सांगावंसं वाटतं की	अनु.: भारती पांडे
वात्सल्यपथ	अनु.: मीरा शिराली

उमा कुलकर्णी यांचे दर्जेदार अनुवाद

पर्व	२००/-
परिशोध	१००/-
चिदंबर रहस्य	१२५/-
तंतू	४५०/-
वंशवृक्ष	१७०/-
डोंगराएवढा	९०/-
नागमंडल (नाटक)	२५/-

शान्ता शेळके यांची सर्वांगसुंदर पुस्तके

सांगावेसे वाटले म्हणून	९०/-
लेखक आणि लेखने	८०/-
अनुबंध	७०/-
पावसाआधीचा पाऊस	९०/-
निमित्तानिमित्ताने (अनुवाद)	७०/-
आंधळी (अनुवाद)	१००/-
आंधळ्याचे डोळे (अनुवाद)	१५०/-
चौघीजणी (अनुवाद)	३००/-

T Book Club

ग्रंथप्रेमींसाठी आकर्षक योजना

प्रथम २० रु. भरून T Book Club चे सभासद व्हा आणि गाजलेल्या इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत मिळवा.

या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. आपण सभासद झाल्यास, ही पुस्तके आपण निम्म्या किंमतीत मिळवू शकता. जसजशी पुस्तके प्रकाशित होतील, तसतशी आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाईल.

आपण ही सर्व सहाही पुस्तके घ्यावयाची आहेत.

T Book Club योजनेअंतर्गत यापूर्वी प्रकाशित झालेली पुस्तकेही आपण ६ पुस्तकांच्या प्रत्येक संचासाठी प्रत्येकी २०रु. भरून निम्म्या किंमतीत मिळवू शकता.

ही सर्वच पुस्तके इंग्रजीतील गाजलेल्या साहित्यकृतींचे उत्तम अनुवाद आहेत.

आजच २० रु. मनीऑर्डरने पाठवा व T Book Club चे सभासद व्हा.

T Book Club - 8 ची सभासद नोंदणी चालू आहे.

आतापर्यंतच्या बुक क्लब मधील उपलब्ध पुस्तके

पुस्तकाचे नाव	मूळ लेखक	अनुवाद	किंमत	सभासदांना
मध्यस्थ	फ्रेडरिक फोरसीथ	लीना सोहोनी	१८०रु.	९०रु.
वाईल्ड कार्ड	रेमंड हॉकी/ रॉजर बिंग हॅम	अरुण मांडे	१५०रु.	७५रु.
लव्ह स्टोरी	एरिक सेगल	अनिल इनामदार	२५रु.	१२-५०रु.
सिटाडेल	ए. जि. क्रोनिन	मंगला निगुडकर	८०रु.	४०रु.
नो कम बॅक्स	फ्रेडरिक फोरसीथ	विजय देवधर	७०रु.	३५रु.
हे बंध वात्सल्याचे	हेरॉल्ड रॉबिन्स	योगिनी वेंगुर्लेकर	६०रु.	३०रु.
तू असा जवळी रहा	हेरॉल्ड रॉबिन्स	पद्मा अभ्यंकर	५०रु.	२५रु.
मुखवटे	ॲगाथा ख्रिस्ती	शर्मिला गाडगीळ	५०रु.	२५रु.
पाषाण	ॲगाथा ख्रिस्ती	शर्मिला गाडगीळ	७०रु.	३५रु.
नाईट	इली वायझेल	आशा कर्दळे	५०रु.	२५रु.
द मिरर क्रॅकड	ॲगाथा ख्रिस्ती	श्रीनिवास गुळवणी	८०रु.	४०रु.
हंट द मॅन डाऊन	विल्यम ह्यूमन	अरुण डावखरे	९०रु.	४५रु.
ट्रिनिटीज चाईल्ड	विल्यम प्राक्नो	अनिल काळे	२५०रु.	१२५रु.
मायस्टोरी	इनग्रिड बर्गमन	आशा कर्दळे	३००रु.	१५०रु.
साक्षी	सरला बार्नबस	स. वा. मुळे	१९०रु.	९५रु.
सिटी ऑफ जॉय	डॅमिनिक लॅपिए	अनिल कुलकर्णी	३००रु.	१५०रु.
नॉट विदाऊट माय डॉटर	बेट्टी महमूदी	लीना सोहोनी	२००रु.	१००रु.
द टर्मिनल मॅन	मायकेल क्रिश्टन	अरुण मांडे	१२०रु.	६०रु.

अत्रे कट्टा

श्री. चंद्रसेन टिळेकर यांनी सुरु केलेला अत्रे-कट्टा मुंबईत चांगलाच लोकप्रिय होऊ लागला आहे. मुलुंड, डोंबिवली, घाटकोपर आणि बोरिवली (प.) डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी उद्यान, चंदावरकर रोड) येथील कट्टे प्रत्येक रविवारी सायंकाळी ५.३० वाजता सुरू होतात. प्रेक्षकांनीच उस्फूर्तपणे बोलून येथे विविध ताज्या विषयावरील चर्चा रंगतात. मंचीय सोपस्कार नसल्याने तो आपल्या कट्टा वाटतो म्हणून प्रेक्षक व वक्ते एकाच समान आसनावर विराजमान असतात. पार्ले येथील २१ तारखेच्या कट्ट्यावर लैला महाजन यांचे 'माझ्या अनुभव विश्वातली स्त्री' या विषयावरील भाषण आणि कवी दत्तात्रय सैतावडेकर यांचं काव्यवाचन होणार आहे. वीर सावरकर पटांगण, विलेपार्ले (प.) येथे हा कार्यक्रम सायंकाळी ५.३० वाजता सुरु होणार आहे. त्याप्रमाणे दादर येथेही अत्रे कट्टा सुरू करण्याचे ठरले आहे. दादरमधील एक ज्येष्ठ नागरिक श्री श्रीकांत देसाई यांनी बालमोहन विद्यामंदिरासमोरील शिवाजी पार्क येथील मैदानात ***आज रविवार १५ मार्च रोजी एक प्राथमिक बैठक बोलावली आहे.*** श्री चंद्रसेन टिळेकर आणि सौ. नीलिमाताई टिळेकर यावेळी तेथे मार्गदर्शन करणार आहेत. ***सायंकाळी ६.३० वाजता या बैठकीस सगळे अत्रे कट्टाप्रेमी उपस्थित राहून शकतात.*** श्री. श्रीकांत देसाई यांच्याशी ४४५७८५८ या दूरध्वनीवर संपर्क साधला तरी चालेल.

विनोदी साहित्यातील स्त्रीप्रतिमा

विनोदी साहित्यातून स्त्रीचे हेटाळणीवजा, टिंगलवजा चित्रण येण्याचे महत्त्वाचे समाजशास्त्रीय कारण म्हणजे स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान हे होय. पूर्वीपासूनच स्त्री ही समाजात नगण्य मानली गेली. तिच्याकडे एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहिले गेले. तिच्यातील पात्रता, तिचे गुण उभरू नयेत अशीच अवस्था आपल्या समाजात करण्यात आली. पुरुषी स्वामित्वाचे अंतरंग अजूनही बदलेले नाही. त्यामुळे विनोदी साहित्यिकांनी तिला साहित्यातून स्त्रीची टर इटण्याचे महत्त्वाचे आणखी एक कारण म्हणजे विनोदी साहित्यक्षेत्रात स्त्रीलेखिकांची कर्तृत्वहीनता धक्कादायक आहे. इंद्रायणी सावकार, मंगला गोडबोले, शंकुतला फडणीस, शोभा बोंद्रे, शंकुतला बोरगावकर, अशा काही स्त्रीलेखिका विनोदी लेखन करीत असल्या तरी ते फारसे नाही. त्यामुळे स्त्रीलेखिकांचे या प्रकाराकडे दुर्लक्षच झाले आहे. त्यामुळेच स्त्रियांना विनोदबुद्धी नसते, स्त्रियांना विनोद कळत नाही अशा बिनबुडाच्या अनुमानावर आधारित समाजात प्रतिष्ठेने मिरवणाऱ्या अफवा परसलेला दिसतात. विनोदी साहित्यातील स्त्रीशरीराभोवती फिरणारा विनोद हा साहित्यिकांप्रमाणेच वाचकांचीही विनोदाकडे पाहण्याची दृष्टी विकृत असल्याचे दर्शवितो.

ज्ञा राम पारपिल्लेरवार यांनी फ्रेंच शिल्पकार रोदँ (याच्या जीवनकहाणीला कादंबरीच्या स्वरुपात पेश करण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. आपल्याकडे या चित्रकाराबद्दल फारशी माहिती नाही. ती या पुस्तकामुले होईल. लस्ट फॉर लाइफ वाचल्यावर व्हिन्सेंट व्हॅन गॉग या चित्रकाराचे नाव आपल्याकडे सर्वांना जवळचे वाटू लागले. 'दि ॲगनी अँड द एकस्टसी' वाचल्यावर मायकेल एंजेलोशी आपली जानपहचान घनिष्ठ झाली. तसे रोदँबद्दल या पुस्तकामुळे प्रेम वाटायला हरकत नाही. स्वतः पारपिल्लेवार हे भारत-फ्रान्स मित्रमंडळाच्या माध्यमातून फ्रान्समध्ये जाऊन एक महिना भटकून आले. त्याबद्दल त्यांनी माणूसमध्ये पॅरिस आय लव्ह यू नावाने एक लेखमाला ही लिहिली. पाश्चात्य साहित्यिकांवरही त्यांनी बरेच परिचयात्मक लेख लिहिले आहेत. रेल्वेत नोकरी करून, वल्लारशा सारख्या ठिकाणी राहूनही त्यांनी आपले लेखनवाचन जारी टेवले. १९७५मध्ये पॅरिसहून परतताना तेथील एका मित्राने रोदँचे शिल्पप्रदर्शन दाखवले; त्याच्याबद्दलचे एक पुस्तक भेट दिले. त्या पुस्तकातून जाणवलेला 'पराभव गंड' (डिफीट कॉम्प्लेक्स) पारपिल्लेवार यांना वेटाळून गेला. खूप जीवघेण्या संघर्षातून रोदँचा कलाविष्कार झाला; त्याच्या शिल्पात एक प्रकारची भव्यता व महात्मता झाला; या रोदँबद्दल पुढे त्यांनी एक कथा लिहिली. त्यानंतर ही कादंबरी. त्यासाठी भरपूर पुस्तके मिळवली. (त्यांची सूची शेवटी दिली आहे). तेथील स्थळांचे, जीवन शैलीचे तपशील मिळवले. ते सारे सविस्तर रापरल्याने कादंबरीची पृष्ठसंख्या, ४६० होणे अटळच म्हणावे लागेल. व यूरोपमधील महत्त्वाच्या घटनाही शेवटी दिल्या आहेत. त्याच्या आयुष्यातील जवळच्या व्यक्ती म्हणजे त्याची घटस्फोटित पत्नी कॅमिली क्लॉडेल, त्याची मैत्रीण ग्वेन जॉन, पेटिट ऑगस्ट, ज्युडिथ क्लॉडेल, यांचे पुढे काय झाले तेही थोडक्यात दिले आहे. कॅमिली ही रोदँपासून वेगळी झाल्यावर कामय रोदँचा दुस्वास करीत राहिली. १९१३ मध्ये ती मनोरुग्णालयात दाखल झाली. १९४३ मध्ये ती मरण पावली. रोदँशी विभक्त झाल्यावर ५० वर्षे ती जगली; ती वर्षे तिने अत्यंत दुरवस्थेत काढली. रोदँची दुसरी प्रेयसी ग्वेन जॉन ही मात्र कायम त्याच्यावर जीव टाकत राहिली. तीही एकाकी जीवन जगली. खूप मांजरे पाळून त्यांची देखभाल करण्यात तिने वेळ घालवला. समुद्राबद्दल तिला ओढ होती. १८ सप्टेंबर १९३९ रोजी ती मरण पावली. पेटिट ऑगस्ट अविवाहित होता रोदँच्या मृत्यूनंतर १९ वर्षांनी तो अतिरिक्त मद्यपानाने मरण पावला. रोदँचे 'थी कर' हे शिल्प क्लीव्हलँडमध्ये उभारलेले होते. १९७०मध्ये ते स्फोटक दारूने उडवण्यात आले. रोदँच्या आयुष्यात आलेल्या व्यक्तींचीही काहीशी परवड झाली.

फ्रान्स्वा ऑगस्टरेने रोदँचा जन्म १२ नोव्हेंबर १८४० रोजी झाला. पॅरिसमध्ये त्याचे वडिल ज्याँ बाप्टीस्ट रोदँ ३८ वर्षाचे होते. आई मारी शेफर ३४ वर्षांची बाप निरक्षर होता.